SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे । महिलांसाठी पादत्राणे । मुलांसाठी पादत्राणे क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता! Liberty SHOES लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस सारडागल्ली, अ.नगर मो : 9881531536

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २४.०७.२०२६ | अंक नं. ०९८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

CAMEL SAGO कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टंट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

चांदीमधील चैन, ब्रासलेट, अंगठी, पेंडन्टच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ ९९९/-*
Conditions Apply*

मान्सून मध्ये मिळवा डिस्काउंट UPTO 50%
दररोज पहिल्या 100 महिलांना ₹5000 च्या खरेदीवर चांदीची भेटवस्तू
अहिल्यानगरकर !! साक्षिदार व्हा सर्वात मोठ्या पैठणी आणि साडी महोत्सवाचे
स्थळ : बंधन लॉन्स डि-मार्ट जवळ, सावेडी, अहिल्यानगर 91 452 452 52
सोनाली पैठणी अँड सिल्क साडी (येवला)
23 जुलै ते 2 ऑगस्ट 2026
सकाळी 10 ते रात्री 10 वाजेपर्यंत

# केडगावमध्ये रभाजीनगर भागात नागरी वस्तीत ‘बिबट्याचा वावर’

## शालेय विद्यार्थी, पालकांमध्ये भीतीचे वातावरण; वनविभागाने लावला पिंजरा

नगर - केडगाव मधील लिंक रोड परिसरातील रभाजी नगर भागातील रवी कोतकर यांच्या शेतामध्ये अनेक दिवसापासून बिबट्याचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. या परिसारात पोदार इंटरनॅशनल स्कूल, कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल, पश्चिमेकडे जगदंबा शाळा, ओरिस स्कूल अशा अनेक मोठमोठ्या शाळा आहेत. यामध्ये अनेक विद्यार्थी शाळेसाठी येतात. यामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये देखील भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



रभाजीनगरमधील रवी कोतकर यांच्या शेतामध्ये बिबट्याला पकडण्यासाठी लावण्यात आलेला पिंजरा. (छाया - अमित मन्यार, नगर)

बिबट्याचा वावर असल्याचे वनविभागास पंधरा दिवसांपूर्वीच सांगितले गेले होते. बिबट्या व त्याची दोन पिल्ले अनेकांना दिसली होती. या भागातील शेतामध्ये वस्तीतील एका कुत्र्याचा बिबट्याने फडशा पाडला होता. घटनेनंतर त्यावेळेस देखील वनविभागाचे कर्मचारी आल्यानंतर त्यांनी परिसरात बिबट्या असल्याची खात्री केली होती. परंतु त्यांनी वस्तीवरील लोकांना अट अशी घातली की पिंजरा लावायचा असेल तर आपणच वाहनाची व्यवस्था करावी व पिंजरा अमुक या ठिकाणी लावलेला आहे त्या ठिकाणा वरून आणून लावावा असे सांगण्यात आले.

२३ जुलै रोजी संध्याकाळच्या सुमारास कोतकर कुटुंबातील महिला जनावरासाठी चारा आणण्यासाठी गेली असता शेतामध्ये दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. सुदैवाने त्या बालंबाल बचावल्या आहेत. या घटनेनंतर पुन्हा वनविभागाला तात्काळ रात्री घटनेची माहिती सांगितली. कोतकर कुटुंबीयाला संपूर्ण रात्र बिबट्याच्या दहशतीखाली काढावी लागली. सकाळी वनविभागाचे कर्मचारी कोतकर कुटुंबाच्या घरी आले. त्यानंतर रवी कोतकर यांनी शेजारील वस्तीवरील ट्रॅक्टर बोलवत तो पिंजरा वन विभागाच्या आलेल्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने आपल्या शेतात लावला आहे. परंतु जोपर्यंत बिबट्या पिंजऱ्यात अडकत नाही तोपर्यंत हा परिसर मात्र बिबट्याच्या दहशतीखाली राहणार आहे.

# नगरमध्ये काळ्या कोटावर लागल्या ‘लाल फिती’

## दिल्लीत विद्यार्थ्यांवर झालेल्या ‘अमानुष लाठीचार्ज’चा वकिलांनी नोंदवला निषेध

नगर - दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलनकर्त्या युवकांवर झालेल्या अमानुषपणे लाठीचार्ज घटनेचा व पोलिसांचा अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने निषेध करण्यात आला आहे. २४ जुलै रोजी जिल्हा न्यायालयात असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व वकिलांनी आपल्या काळ्या कोटावर लाल फिती लावून या घटनेचा निषेध करत न्यायालयीन कामकाज केले. न्यायालयाच्या पायऱ्यांवर सर्व वकील जमून घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली तसेच या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.



दिल्लीतील जंतरमंतर येथे युवकांवर झालेल्या अमानुषपणे लाठीचार्ज घटनेचा अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने निषेध करण्यात आला.

ॲड. कृष्णा झावरे म्हणाले, दिल्ली येथे जंतर मंतरवर देशातील युवक लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. या आंदोलनकर्त्या युवकांच्या मागण्यांकडे गांभीर्याने बघण्यापेक्षा त्यांचे आंदोलन दडपण्यासाठी पोलिसांनी त्यांच्यावर अमानुषपणे लाठीचार्ज केला. या घटनेचा सर्व वकील निषेध करत आहेत. युवकांवर झालेला लाठीचार्ज हा अन्यायकारक असून याची साखोल चौकशी करून दोषीवर योग्य कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी केली.

ज्येष्ठ विधीज्ञ सुरेश लगड म्हणाले, गेल्या अनेक दिवसांपासून देशातील विद्यार्थी सनदशीर मार्गाने जंतर मंतर येथे आंदोलन करत असताना पोलिसांनी केलेला लाठीचार्ज अत्यंत निंदनीय आहे. ही घटना लोकशाहीला काळिमा लावणारी आहे. त्यामुळे या घटनेच्या निषेधार्थ सर्व वकिलांनी आपल्या कोटला लाल फीत लावून निषेध नोंदवत न्यायालयीन कामकाज केले आहे.

यावेळी वसिम खान यांनीही मनोगत व्यक्त केले. या आंदोलनात वकील संघटनेचे उपाध्यक्ष अमोल अकोलकर, विनोद शेटे, प्राजक्ता करांडे, माजी अध्यक्ष अनिल सरोदे, गौरव दांगट, जालिंदर कांबळे, अमृत पवार, अजय बचाटे, संकेत सुंबे, कादंबरी मोरे, महेश काळे, राजनंदीनी पुंडे, सुनील धाकणे, रोहित कळमकर, स्वप्नील बिहाणी, बाळासाहेब चव्हाण, भाऊसाहेब भालसिंग, पिंटू पाटोळे, कश्यप तरकसे, सुरेश भोर, धनंजय वाघ, रणजित गोरे, संदीप साठे, सुभाष धामणे, महेश सुसे, युवराज पाटील आदी उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपणारे दोन
समाजप्रेमी
व्यक्तिमत्व



स्व. विलासजी लोढा
(स्वर्गवास दि. २५ जुलै २०२२)



स्व. झुंबरलालजी बोथरा
(स्वर्गवास दि. १५ जुलै २०२४)

आपल्या विचारांचा ठेवा सदैव आमच्या सोबत राहील.
आपल्या स्मृतिस विनम्र अभिवादन
उन्नती की ओर
श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ, अहिल्यानगर संचालक मंडळ व सर्व समाज बांधव

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# माळीवाड्यात भांडण सोडवायला गेलेल्या तरुणावर जीवघेणा हल्ला

**सोन्याची साखळी आणि रोख रक्कम लुटली, ७ जणांवर गुन्हा दाखल**

नगर – शहरातील ब्राह्मण गल्ली, माळीवाडा परिसरात भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत त्याच्या गळ्यातील सोन्याची साखळी आणि रोख रक्कम बळजबरीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कृष्णा खंडूअप्पा भागानगरे (वय ३०, रा.पंचपीर चावडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २१ जुलै रोजी रात्री १२ च्या सुमारास आपल्या घरी असताना त्यांचे मित्र सागर डोंगरे यांचा फोन आला. घरासमोर वाद सुरू असल्याचे समजताच कृष्णा हे आपल्या साथीदारासह घटनास्थळी पोहोचले. तिथे वाद मिटवण्याचा प्रयत्न करत असताना केरप्पा हुचे उर्फ भाऊ, विशाल उर्फ बंडू हुचे, सुजाता हुचे आणि त्यांच्यासोबत असलेल्या चार अनोळखी महिलांनी कृष्णा आणि त्यांच्या सहकाऱ्याला अडवले.

आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या साथीदाराला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आण रे पिस्तुल यांचा एक संपवला आहे, यांना पण संपवून टाकू, अशी धमकी देत आरोपींनी फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची साखळी आणि जवळील रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली. या प्रकरणी कृष्णा भागानगरे यांच्या तक्रारीवरून २३ जुलै रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११९(१), ११८(१), ३५१(२), ३५२, १९० आणि १८९(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देशमुख या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# नगर शहरातील सार्वजनिक शौचालये, पाणी तसेच रस्त्यांच्या प्रश्नावर मनपा प्रशासनाला धरले धारेवर

**स्थायी समितीच्या सभेत सदस्य आक्रमक**

नगर – महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत शहरातील विविध नागरी प्रश्नांवरुन प्रशासनाला सदस्यांनी चांगलेच धारेवर धरले. शहरातील सार्वजनिक शौचालयांची दुरवस्था, पुणे महामार्गावरील रेल्वे क्रॉसिंग पुलावरील तुटलेले कठडे, कल्याण रोडवरील नवीन पाणीटाकीचा प्रस्ताव, बोल्हेगाव-मधील रस्त्यांची अवस्था, सभेत आरोग्य अधिकाऱ्यांची अनुपस्थिती आदी विषयांवर सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरत तातडीने कार्यवाहीची मागणी केली.



स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी सभापती मनोज कोतकर, सदस्य निखिल वारे, मनोज दुल्लम, सुरेश बनसोडे, नवनाथ कातोरे, सोनाबाई शिंदे, गौरी बोरकर, सुनिता कुलकर्णी आदी.

२४ जुलै रोजी स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी सभापती मनोज कोतकर, सदस्य निखिल वारे, मनोज दुल्लम, सुरेश बनसोडे, नवनाथ कातोरे, सोनाबाई शिंदे, गौरी बोरकर, सुनिता कुलकर्णी उपस्थित होते.

सभापती लोंढे यांनी कल्याण रोडवरील नवीन पाणीटाकीच्या प्रकल्प अहवालाबाबत विचारणा केली. यावर जलअभियंता गणेश गाडळकर यांनी साधारण एक महिन्यात प्रकल्प अहवाल तयार होईल. यापूर्वीच्या डीपीआरमधील माहितीचा उपयोग करण्यात येईल, असे सांगितले.

माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी ठेकेदाराची नियुक्ती कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर अहवाल पूर्ण झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. बाबासाहेब वाकळे यांनी काम उशिरा करणाऱ्या ठेकेदारांवर दंड आकारला जातो, त्याचप्रमाणे मुदतपूर्वी काम पूर्ण करणाऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस द्यावे, त्यामुळे कामे वेळेत पूर्ण होतील, अशी सूचना केली.

सभापती सुभाष लोंढे यांनी कल्याण रोडवरील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी ही पाणीटाकी अत्यंत आवश्यक असून तिची सर्व प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रत्यक्ष काम तातडीने सुरू करावे, असे निर्देश दिले.

सदस्य मनोज कोतकर यांनी पुणे महामार्गावरील रेल्वे ओव्हरब्रिजची दुरावस्था आणि तुटलेले कठडे याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, या पुलाखाली लोकवस्ती आहे. कठडे तुटलेले असल्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बोट दाखवून चालणार नाही. महानगरपालिकेने तातडीने पत्रव्यवहार करून हा प्रश्न सोडवावा. आवश्यक असल्यास नवीन उड्डाणपुलासाठीही पाठपुरावा करावा.

सदस्य निखिल वारे यांनी माहिती देताना सांगितले की, रेल्वेशी संबंधित कंपनी नवीन पुलाच्या उभारणीसाठी शहरात येऊन प्राथमिक सर्वेक्षण करून गेली असून पुढील प्रक्रिया सुरू असल्याचे ते म्हणाले.

सदस्य नवनाथ कातोरे यांनी बोल्हेगाव परिसरातील रस्त्यांवर खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले असल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तातडीने मुरूम टाकून उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली.

यावर शहर अभियंत्यांनी वार्षिक निविदा मंजूर नसल्याचे सांगितले. त्यावर निखिल वारे व बाबासाहेब वाकळे यांनी मग मुरूम कधी टाकणार? निविदा का मंजूर झाल्या नाहीत? तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली.

सदस्य निखिल वारे यांनी आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर हे पूर्वसूचना न देता सभेला अनुपस्थित राहिल्याबद्दल तीव्र आक्षेप घेतला. त्यांच्यावर नोटीस बजावून खुलासा मागवावा, अशी मागणी केली.

सभापती सुभाष लोंढे यांनी अतिरिक्त आयुक्तांना संबंधित अधिकाऱ्यास नोटीस बजावून खुलासा मागविण्याचे निर्देश दिले.

सभेमध्ये शहरातील पे अँड यूज सार्वजनिक शौचालयांच्या दुरवस्थेचा मुद्दा चांगलाच गाजला. सभापतींनी माहिती विचारल्यानंतर परिक्षित बीडकर यांनी सांगितले की, सन २००३ मध्ये कल्याण येथील एका संस्थेला शौचालये चालविण्यास देण्यात आली होती. ठेकेदारांनी आवश्यक सुविधा उपलब्ध न केल्याने नोटिसा देण्यात आल्या आहेत. चार ठिकाणी फीडबॅक मशीन बसविण्याची व्यवस्था आहे; मात्र पाणीपुरवठा नसल्यामुळे ती काढून ठेवण्यात आली आहेत.

सदस्य निखिल वारे यांनी सांगितले की, सर्व सार्वजनिक शौचालयांचे व्हिडिओ पाहिले असून कुठेही योग्य सुविधा उपलब्ध नाहीत. ज्यांना शौचालये चालविण्यास दिली आहेत, त्यांनी नागरिकांना आवश्यक सुविधा दिल्याच पाहिजेत. यावर बीडकर यांनी सांगितले की, जुन्या करारनाम्यामध्ये देखभाल-दुरुस्तीबाबत कोणत्याही अटी नव्हत्या. त्यामुळे विद्यमान करार रद्द करून नवीन निविदेमध्ये देखभाल, दुरुस्ती व सुविधा पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर टाकण्यात येणार आहे. सध्या मनपाला दर सहा महिन्यांनी सुमारे २५ लाख रुपयांचा खर्च करावा लागत आहे.

निखिल वारे, बाबासाहेब वाकळे आणि सुरेश बनसोडे यांनी २० वर्षांऐवजी ५ वर्षांच्या कालावधीसाठीच करार देण्याची मागणी केली. निखिल वारे यांनी विद्यमान ठेकेदाराकडून झालेल्या नुकसानीची भरपाई वसूल करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर बीडकर यांनी जुन्या करारात तशी तरतूद नसल्याचे सांगितले. त्यांनी नवीन निविदेतील अटी-शर्ती सभागृहासमोर वाचून दाखविण्यात आल्या.

# भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी गीता गिल्डा यांची निवड

**जिल्ह्यातील ४ महिलांचा राज्य कार्यकारिणीत समावेश**



नगर – भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांनी २३ जुलै रोजी महिला मोर्चाची राज्य कार्यकारिणी जाहीर केली. या कार्यकारिणीत अहिल्यानगर जिल्ह्यातील चार महिलांची महत्त्वाच्या पदांवर निवड करण्यात आली असून, महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी गीता गिल्डा यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीत अहिल्यानगर शहरातील गीता गिल्डा आणि अहिल्यानगर ग्रामीणमधून कांचन मांढरे यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वैशाली चव्हाण आणि सोनाली नायकवाडी यांची प्रदेश सचिवपदी निवड झाली आहे. राज्य कार्यकारिणीत जिल्ह्यातील चार महिलांना स्थान मिळाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महिला मोर्चाचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी तसेच राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना आणि उपक्रम तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ यांनी व्यक्त केला.

# तरुणाचे अपहरण व जीवघेणा हल्ला प्रकरणी २ आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

नगर – नगर तालुक्यातील दरेवाडी येथील तरुणाचे अपहरण करून त्याला लोखंडी फायटर आणि काठीने मारहाण करत सोन्याची साखळी जबरदस्तीने काढून घेतल्याच्या गंभीर गुन्ह्यातील दोन आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

दरेवाडी येथील रहिवासी रोहित गोकुळ जगताप यांना सजावटीच्या कामाच्या बहाण्याने फोन करून साई स्पर्श मंगल कार्यालय येथे बोलावून घेण्यात आले होते. तेथे आरोपींनी रोहित यांचे अपहरण केले आणि त्यांना अज्ञात स्थळी नेऊन लोखंडी फायटर व काठीने जीवघेणा हल्ला केला. यावेळी आरोपींनी त्यांच्या गळ्यातील १.५ तोळ्याची सोन्याची साखळी जबरदस्तीने काढून घेतली होती. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील आरोपी सुदर्शन सतीश भापकर आणि किरण नवनाथ जगदाळे (दोघे रा. दरेवाडी, ता.नगर) यांनी अटकपूर्व जामिनासाठी नगर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सुनावणीदरम्यान मूळ फिर्यादीतर्फे ॲड. आर. जे. भामरे यांनी न्यायालयात बाजू मांडताना वैद्यकीय अहवाल आणि पुरावे निदर्शनास आणून दिले. आरोपींनी फिर्यादीचे अपहरण करून निघृणपणे मारहाण केली असून, गुन्ह्यात वापरलेली हत्यारे आणि चोरलेली सोन्याची साखळी हस्तगत करणे अद्याप बाकी आहे, तसेच जामीन मिळाल्यास आरोपी पुराव्यांशी छेडछाड करू शकतात, असा जोरदार युक्तिवाद ॲड. भामरे यांनी केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सरकारी पक्षाचे म्हणणे विचारात घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे ॲड. आर. जे. भामरे यांनी तर सरकारी पक्षातर्फे ॲड. एम. पी. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# घरात घुसून वृद्धाला मारहाण करत दागिने व रोकड चोरट्यांनी पळविली

नगर – रात्रीच्या वेळी घरात घुसून एका वृद्धाला लाकडी दांडक्याने व लोखंडी गजाने बेदम मारहाण करत सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना पारनेर तालुक्यातील रायतळे येथील चितळकर वस्तीवर घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायतळे येथील चितळकर वस्तीवर राहणारे महेश मारुती चितळकर (वय २९) यांच्या घरात २३ जुलै रोजी पहाटे १२.५० वाजण्याच्या सुमारास चार अनोळखी चोरट्यांनी बेकायदेशीरपणे प्रवेश केला. चोरट्यांनी महेश यांचे आजोबा रामकृष्ण श्रीपती चितळकर (वय ९५) यांना लाकडी दांडक्याने आणि लोखंडी गजाने मारहाण करून गंभीर जखमी केले.

त्यानंतर घरातील एकूण १लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम बळजबरीने चोरून नेली. या घटनेत वृद्ध रामकृष्ण चितळकर हे जखमी झाले आहेत.

याप्रकरणी महेश चितळकर यांनी दिलेल्या फिर्यादी वरून २३ जुलै रोजी रात्री सुपा पोलीस ठाण्यात चार अनोळखी इसमांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सुपा पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कोठूळे या दरोड्याचा पुढील तपास करत आहेत.

# वाहतूक नियमभंग करणाऱ्या १४४ वाहनांवर कारवाई

नगर – शहर वाहतूक शाखेच्या वतीने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मार्केट यार्ड चौक व जीपीओ चौक येथे नाकाबंदी करून एकूण १४४ वाहनांवर कारवाई करण्यात आली.

२३ जुलै रोजी सायंकाळी मार्केट यार्ड चौक येथे नाकाबंदी करून आकर्षक (फॅन्सी) नंबरप्लेट, काळी काचपट्टी (ब्लॅक फिल्म), विनाक्रमांक वाहने, वाहन परवाना नसणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६६ वाहनांवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक रामराव शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक अन्सार शेख, पोलीस उपनिरीक्षक शाम्युवेल गायकवाड, सहायक पोलीस उपनिरीक्षक नरेश कोडम, हवालदार फुलमाळी तसेच पोलीस अंमलदार सचिन पवार, विजय राठोड, गणेश दहिफळे आणि धनराज राठोड यांनी सहभाग घेतला.



मार्केट यार्ड चौक येथे नाकाबंदी करुन वाहतूक नियमांचे उल्लंघन करताना वाहतूक शाखेचे पोलीस.

तत्पूर्वी, जीपीओ चौक येथे नाकाबंदी करून उच्च सुरक्षा नोंदणी नंबरप्लेट (एचएसआरपी) नसलेली वाहने, वाहन परवाना नसणे, काळी काचपट्टी लावलेली वाहने, नंबरप्लेट नसलेली वाहने तसेच अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७८ वाहनांवर कारवाई करण्यात आली.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक श्यामुवेल गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक रामराव शिरसाट, सहायक पोलीस उपनिरीक्षक नरेश कोडम, सहायक पोलीस उपनिरीक्षक घोरपडे, पोलीस अंमलदार चव्हाण, पवार, दहिफळे, जपकर, शिंदे, दळवी, खंडागळे, महिला पोलीस अंमलदार सना सय्यद तसेच सुभाष गावडे, अरविंद चौटीले, रियाझ शेख आणि रेश्मा लोणारे यांनी सहभाग घेतला.

## जुना बाजार परिसरातून मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील जुना बाजार रस्ता परिसरात रॉयल ट्रेडर्स आणि महावीर ट्रेडर्सजवळ हँडल लॉक करून पार्क केलेली सुझुकी कंपनीची क्सेस मोपेड (क्र. एमएच १६ सीबी२०१२) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २२ जुलै रोजी पहाटे ३.४५ ते ५.१५ च्या सुमारास घडली आहे.

याबाबत नाझीम नदीर शेख (वय ४५, आलमगीर, भिंगार) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# नगर - पुणे महामार्गावर वाहनाच्या धडकेत तरुण ठार

नगर – नगर पुणे महामार्गावरील पळवे शिवारात रस्ता ओलांडणाऱ्या एका ३५ वर्षीय तरुणाला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात त्याचा मृत्यू झाला आहे. ही घटना प्रविण ढाब्यासमोर घडली असून, या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विष्णू रामराव चौधरी (वय ३५, रा. माखणी, ता. गंगाखेड, जि. परभणी) असे या अपघातात मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ जुलै रोजी पहाटे ३.१५ वाजेच्या सुमारास पुणे ते नगर जाणाऱ्या महामार्गावर पळवे शिवारातील प्रविण ढाब्यासमोर विष्णू चौधरी हे रस्ता ओलांडत होते. त्यावेळी भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात विष्णू यांच्या डोक्याला आणि तोंडाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला.

या प्रकरणी मयताचा भाऊ योगीराज रामराव चौधरी (वय ३३, रा. माखणी, ता. गंगाखेड, जि. परभणी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २३ जुलै रोजी सुपा पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) सह मोटर वाहन कायद्याच्या कलम १८४, १३४(अ)(ब) आणि १७७ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनिल कुटे या अपघाताचा पुढील तपास करत आहेत.

# सावेडीत लेडीज शॉपीमधून दीड लाखांचे साहित्य लांबवले

**न्यायालयाच्या आदेशानंतर चार जणांविरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

नगर – शहरातील सावेडी परिसरातील 'मधुरा लेडीज शॉपी' या दुकानात बेकायदेशीरपणे प्रवेश करून सुमारे १ लाख ५० हजार रुपये किमतीचे टेलरिंग व कटलरीचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानंतर चार जणांविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सावेडी येथील संचारनगरमधील रहिवासी आणि सेवानिवृत्त नागरिक हनुमंतराव रामराव गोपाळघरे (वय ६८) यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. संचारनगर येथील 'मधुरा लेडीज शॉपी' या दुकानामध्ये २४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी सव्वादोनच्या सुमारास आरोपींनी बेकायदेशीर प्रवेश केला.

यावेळी दुकानातील अस्ताराचे तागे, फॉलची बंडले, ब्लाऊज पीसचे गठ्ठे, लटकनचे डबे, लेस, नॉट व धाग्यांचे बॉक्सेस, बटण, क्लचर, रबर आणि टिकल्यांचे बॉक्सेस यासह आर्टिफिशिअल ज्वेलरीचे बॉक्सेस असा एकूण १ लाख ५० हजार रुपयांचा माल चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी या प्रकरणी फिर्यादी हनुमंतराव गोपाळघरे यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर २३ जुलै रोजी रात्री तोफखाना पोलीस ठाण्यात दीपाली उर्फ राजश्री अमोल गोपाळघरे (वय ४०), शुभम ज्ञानदेव बडे (वय ३५), सोनाली अनिल चाटे (वय ३७) आणि गणेश विकास वारे (वय २१, सर्व रा. यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) या चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तोफखाना पोलीस ठाण्याचे पो.हे.कॉ. गांगर्डे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अहिल्यानगर शहरात दोन ठिकाणी कत्तलखान्यांवर पोलिसांची छापेमारी

**गोवंशीय जनावरे, गोमांस, कत्तलीचे साहित्य जप्त; दोन वेगवेगळे गुन्हे दाखल**

नगर – अहिल्यानगर शहरात अवैध गोमांस बाळगणाऱ्या आणि गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांविरोधात तोफखाना पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. २३ जुलै रोजी शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी हजारो रुपयांचे गोमांस, कत्तलीचे साहित्य आणि इतर मुद्देमाल जप्त करत ३ आरोपींवर गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या कारवाईत, सर्जेपुरा येथील कौलारू कॅम्प मशिदीजवळ अवैध गोमांस विक्री सुरू असल्याची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत व्यापारी मोहल्ला येथील रहिवासी इम्रान मोहम्मदहानिफ कुरेशी (वय ४०) याच्या ताब्यातून ४,२०० रुपये किमतीचे सुमारे २० किलो गोमांस आणि एक लोखंडी सुरा जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस अंमलदार सुजित सोमवंशी यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ आणि महाराष्ट्र पशुसंरक्षण कायद्यान्वये तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अंमलदार सय्यद या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

दुसऱ्या घटनेत, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने झेंडीगेट परिसरातील सुभेदार गल्ली येथे छापा टाकला. तेथे आरोपी मोहम्मद सलीम फैयाज कुरेशी (वय ३३) आणि रिजवान फैयाज कुरेशी (वय २८) यांनी गोवंश जनावरांना विनाचारा-पाण्याचे डांबून ठेवून त्यांची कत्तल केल्याचे समोर आले.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी १०० किलो गोमांस, इलेक्ट्रिक वजनकाटा, लोखंडी सतूर आणि लाकडी टोचा तसेच काही गोवंशीय जनावरे असा एकूण ९५,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस अंमलदार योगेश कर्डिले यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात प्राण्यांना निर्दयतेने वागवणे आणि पशुसंरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून पो.हे.कॉ. गंगावणे पुढील तपास करत आहेत.

# 'जेन-झी आंदोलनकर्त्यांना' ड्रग्ज रॅकेटमध्ये अडकवण्याची धमकी देणाऱ्या पोलिसाची बडतर्फी करा; ठाकरे सेनेची मागणी

नगर – मुंबईतील जेन-झी आंदोलनादरम्यान काही आंदोलनकर्त्या तरुणांना ड्रग्ज रॅकेटमध्ये अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोप असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यावर तातडीने बडतर्फीची कारवाई करावी, अशी मागणी ठाकरे शिवसेनेचे अहिल्यानगर महानगरप्रमुख किरण काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

काळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुंबईतील सायन पोलीस ठाण्याचे कर्मचारी पवन सांगळे यांनी आंदोलनकर्त्यांना ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याची धमकी दिल्याचा व्हिडिओ अत्यंत धक्कादायक असून, ही राज्याच्या गृह खात्यासाठी लाजिरवाणी बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात पोलिसांचा ड्रग्जशी संबंध आढळल्यास थेट बडतर्फीची कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यामुळे या प्रकरणातही त्याच भूमिकेची अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनात पोलिसांकडून झालेल्या कथित गैरवर्तनाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करत, जेन-झी आंदोलन हे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित असल्याचे काळे यांनी म्हटले आहे. तसेच आंदोलनकर्त्यांना कायदेशीर मदत देण्यासाठी ठाकरे शिवसेनेने विशेष हेल्पलाईन सुरू केली असून, खोटे गुन्हे दाखल झालेल्या विद्यार्थी व आंदोलकांना आवश्यक ती कायदेशीर मदत दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### जीवनरक्षक प्राथमिक उपचार

प्राथमिक उपचार म्हणजे अपघात झाल्यानंतर डॉक्टर येईपर्यंत दिलेली तातडीची मदत. यालाच 'जीवनरक्षक कवच' असे म्हणतात. कारण वेळेवर केलेला एक छोटासा उपाय मोठा धोका टाळू शकतो. जखम होणे, भाजणे आणि मुंगी चावणे या घरात अगदी सहज घडणाऱ्या घटना आहेत. योग्य प्राथमिक उपचार माहिती असतील तर कोणतीही परिस्थिती सहज हाताळता येते. स्वच्छता, थंड पाणी आणि योग्य पट्टी हेच याचे मुख्य आधार आहेत. जखम झाल्यास जखमेतून रक्तस्त्राव होणे साहजिक आहे. सर्वात आधी स्वच्छ कापडाने जखमेवर दाब देऊन रक्त थांबवावे. नंतर स्वच्छ पाणी आणि साबणाने जखम धुवावी. त्यानंतर डेटॉल किंवा पिव्होडिनसारखे अँटिसेप्टिक लावून कोरडी पट्टी बांधावी. यामुळे जंतुसंसर्ग होत नाही. जखम खोल असेल किंवा गंजलेल्या वस्तूने लागली असेल तर टिटॅनसचे इंजेक्शन घेणे आवश्यक आहे. जखमेवर माती किंवा हळद लावू नये.भाजल्यासआग, गरम पाणी, तेल किंवा वीज यामुळे भाजू शकते. भाजल्यावर लगेच १० ते १५ मिनिटे वाहते थंड पाणी ओतावे. यामुळे जळजळ कमी होते आणि त्वचेचे पुढील नुकसान टळते. बर्फ थेट लावू नये. मुंगी चावल्यास काळ्या किंवा लाल मुंग्या चावल्यावर त्या जागी जळजळ आणि खाज येते. प्रथम ती जागा थंड पाणी आणि साबणाने धुवावी. खाज कमी होण्यासाठी बर्फाचा तुकडा कापडात गुंडाळून शेक द्यावा.

## पाककला

### मिल्क पिसेस

**साहित्य :** दूध १ लिटर, कॉर्नफ्लोअर ४ चमचे, साखर १/२ वाटी, तूप २ चमचे, वेलची पूड १/२ चमचा, पिस्ता काप १ चमचा, तेल तळण्यासाठी

**कृती :** जाड बुडाच्या भांड्यात दूध उकळा. त्यात कॉर्नफ्लोअर आणि साखर पाण्यात कालवून हळूहळू घाला. गुठळ्या होऊ देऊ नका. मिश्रण घट्ट होईपर्यंत ढवळत रहा. त्यात तूप आणि वेलची पूड घालून एका ताटाला तूप लावून त्यात ओता. २ तास फ्रिजमध्ये सेट होऊ द्या. सेट झालेले मिश्रण चौकोनी तुकडे करा. कढईत तेल गरम करून तुकडे दोन्ही बाजूने सोनेरी तळून घ्या. गरमागरम चाशणीत २ मिनिटे बुडवून काढा. वरून पिस्त्याचे काप घालून सर्व्ह करा. चवीला रसमलाईसारखे लागते.

## वास्तू

### रात्री पिण्याचे पाणी संबंधी

रात्री पिण्यासाठी पाणी ठेवायचे असल्यास ते बेडच्या वायव्य कोपऱ्यात ठेवा. ही दिशा आरोग्यासाठी चांगली मानली जाते. तांब्याच्या भांड्यात ठेवा जर ठेवायलाच हवे असेल तर तांब्याच्या भांड्यात आणि झाकण लावून ठेवा. सकाळी ते पाणी झाडांना घाला, पिऊ नका. बेडपासून दूर बेडच्या टेबलऐवजी खोलीच्या कोपऱ्यात किंवा खाली जमिनीवर ठेवावे.

## सौंदर्य

स्वच्छ चेहऱ्यावर फक्त ड्राय पॅच असलेल्या जागी बोटाने थोडा मध लावा. ५ मिनिटे तसाच ठेवा आणि नंतर कोमट पाण्याने धुवा. आठवड्यातून ३ वेळा केल्याने १ आठवड्यात फरक दिसतो.

## सल्ला

कढई आधी चांगली गरम करून मगच मसाला, डाळ किंवा भाजी घातली की ती खाली लागत नाही.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २५ जुलै २०२६

**शयनी एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, ज्येष्ठा अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ७ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** दिवस उत्साहात जाईल. कामात गती राहील. जुनी अडकलेली कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुटुंबासोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. मन प्रसन्न राहील.

**मिथुन :** प्रवासाचे योग आहेत. नवीन लोकांशी ओळख होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**कर्क :** घरात मंगल कार्याची चर्चा होईल. आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. खर्चावर मर्यादा राहील.

**सिंह :** कार्यक्षेत्रात मान-सन्मान वाढेल. वरिष्ठांकडून कौतुक होईल. निर्णय घेताना गडबड नको.

**कन्या :** शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांसाठी दिवस चांगला आहे. मित्रांकडून मदत मिळेल.

**तूळ :** भागीदारीत फायदा होईल. सामाजिक कार्यात नाव होईल. मनात नवीन कल्पना येतील.

**वृश्चिक :** गुंतवणुकीसाठी अनुकूल दिवस. मालमत्तेशी संबंधित कामे पुढे जातील. आत्मविश्वास वाढेल.

**धनु :** दिवसाची सुरुवात चांगली होईल. धार्मिक कार्यात मन लागेल. लांबच्या प्रवासाचे बेत आखले जातील.

**मकर :** नोकरीत नवीन जबाबदारी मिळेल. मेहनतीचे फळ मिळेल. कुटुंबातील वडीलधाऱ्यांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ :** खर्च वाढू शकतो. अनावश्यक गोष्टींवर पैसे जाऊ शकतात. शांत राहून काम करा.

**मीन :** कला आणि सर्जनशील कामांसाठी दिवस उत्तम. समाजात प्रतिष्ठा वाढेल. धनलाभाचे संकेत आहेत.

## शब्दगंध क्र. ७४८० सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) दीर्घ सोडलेला उच्छ्वास ४) ताप येण्यापूर्वीची स्थिती ७) 'दासबोध' या ग्रंथाची रचना करणारे संत ९) उणीव; कमतरता; वानवा १०) एक प्रवासी वाहन १२) धोतरजोडीतील एक भाग; पर्ण १४) वासाचा लोट (विशेषत: उग्र वासाचा) १५) तुलना; हार; बरोबरी; माळ १६) शेष; उरलेले १७) कामावर योजना; ठराविक वेतन; ॲपॉइंटमेंट १९) वस्तू; डाग; नग; धब्बा २०) साखरेचा कढविलेला रस २१) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर २३) निष्णात; पटाईत; कुशल २४) लोखंड घसून साफ करण्याचे हत्यार

**उभे शब्द :** १) परत देण्याच्या बोलीने मागून आणलेले २) सलोखा ; तह; एक वेद; समेट ३) सफलता; सिद्धी ४) कमरेला बांधावयाचा पट्टा किंवा एक दागिना ५) नेहमी; हमेशा ६) कौशल्य; हातोटी ८) एक प्राणी; गाढव; गर्दभ ११) कापसाचे बी १३) मऊ; मृदू; मवाळ १६) फुलधर; बागकाम करणारा; बनकर १८) कमी करणे; काटकसर २२) मलेरिया पसरविणारा एक कीटक; मच्छर

**शब्दगंध क्र. ७४७९ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२४६ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** 'कोणावरही अवलंबून राहू नका. स्वप्न तुमचे आहे तर मेहनतही तुमचीच असली पाहिजे.'

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वेळ पुढेच का जाते, मागे का जात नाही?

सकाळ झाली की रात्र येते. सोमवार नंतर मंगळवार येतो. आजचा वाढदिवस झाला की पुढच्या वर्षीच पुन्हा येतो. पण कधी ऐकले आहे का की कालचा दिवस पुन्हा आला? नाही ना. मग प्रश्न पडतोच की वेळ पुढेच का धावते? ती मागे का वळत नाही?

निसर्गाचा मोठा नियमविश्वात सगळ्या गोष्टी एकाच दिशेने बदलतात. बी मातीत पेरले की त्याचे रोप होते, रोपाचे झाड होते. झाडावरून फळ येते. पण फळापासून पुन्हा थेट बी बनत नाही. आईस्क्रीम उन्हात ठेवले की वितळते. वितळलेले आईस्क्रीम आपोआप पुन्हा घट्ट होत नाही. शास्त्रज्ञ याला बदलाची दिशा म्हणतात. विश्वाला अव्यवस्थित होणे आवडते. आणि अव्यवस्थित होणे ही क्रिया फक्त पुढेच जाऊ शकते, मागे नाही.

आपल्या आठवणी आणि शरीरआपण लहान असतो, मग मोठे होतो. आपण नवीन गोष्टी शिकतो, नवीन खेळ खेळतो, नवीन मित्र बनवतो. या सगळ्या गोष्टी एका ओळीत घडतात. जर वेळ मागे गेली तर काय होईल? आपण शाळेतून पुन्हा अंगणात जाऊ? आपण विसरलेल्या गोष्टी पुन्हा लक्षात येतील का? आपले शरीर पुन्हा लहान होईल का? निसर्गाने आपल्यासाठी पुढे जाण्याचीच वाट ठेवली आहे. त्यामुळेच आपण दररोज काहीतरी नवीन शिकू शकतो.

उष्णता आणि ऊर्जाघरातला गरम चहा थोड्या वेळाने थंड होतो. चालल्यावर आपल्याला दम लागतो आणि घाम येतो. फुटलेला कप आपोआप जुळत नाही. म्हणजे सर्व शक्ती एका बाजूने खर्च होते. ती परत गोळा होत नाही. यालाच विश्वाचा नियम म्हणतात. आणि या नियमामुळे वेळेला फक्त पुढे जाण्याची परवानगी आहे.४. जर वेळ मागे गेली तर काय होईल? विचार करा. आज तुम्ही अभ्यास केला नाही. उद्या परीक्षा आहे. जर वेळ मागे गेली तर तुम्हाला पुन्हा अभ्यासाची संधी मिळेल. हे ऐकायला चांगले वाटते. पण दुसरीकडे, आज तुम्ही नवीन सायकल शिकला. उद्या जर वेळ मागे गेली तर तुम्ही ते विसरून जाल. तुमचे वाढदिवस, सण, सुट्ट्या सगळे पुन्हा पुन्हा येत राहतील. नवीन काहीच घडणार नाही. म्हणून वेळ पुढे जाणेच चांगले आहे.थोडक्यात: वेळ म्हणजे नदीसारखी आहे. नदीचा प्रवाह फक्त एकाच दिशेने जातो. तो कधी मागे येत नाही. वेळ देखील तशीच आहे. ती आपल्याला दररोज नवीन संधी देते, नवीन दिवस देते. म्हणून आजचा दिवस महत्वाचा आहे. आज हसा, खेळा, शिका आणि मोठे व्हा. कारण गेलेला क्षण पुन्हा कधीच येणार नाही.

### रिकामा हंडा

एका छोट्याशा गावाच्या कडेला एक म्हातारी बाई राहायची. तिचे नाव सखूबाई. गावापासून नदी जवळपास अर्धा कोस दूर होती. सखूबाई रोज सकाळी डोक्यावर एक काठी ठेवून तिच्या दोन्ही टोकाला दोन मातीचे हंडे बांधून नदीवर पाणी भरायला जायची.तिच्याकडे दोन हंडे होते. पहिला हंडा नवीन आणि मजबूत होता. त्यातून एक थेंबही पाणी गळत नव्हते. दुसरा हंडा जुना होता. त्याला एका बाजूला बारीकशी भेग पडली होती.रोज जे व्हायचे तेच व्हायचे. सखूबाई घरी परत आली की नवीन हंडा पूर्ण भरलेला असायचा. पण जुन्या भेगाळलेल्या हंड्यातून वाटभर पाणी गळून गेलेले असायचे. त्यामुळे घरी फक्त दीड हंडा पाणीच पोहोचायचे.असे रोज पाहून पाहून त्या भेगाळलेल्या हंड्याला खूप वाईट वाटू लागले. त्याला वाटायचे मी काही कामाचा नाही. माझ्यामुळे सखूबाईंना दुप्पट मेहनत करावी लागते. मी त्यांच्या कामात अडथळा आहे.

दिवसामागून दिवस गेले. शेवटी एके दिवशी हंडा राहू शकला नाही. नदीकाठावर पाणी भरताना तो रडवेल्या आवाजात म्हणाला, सखूआज्जी, मला माफ करा. गेले दोन वर्ष मी तुम्हाला पूर्ण पाणी देऊ शकलो नाही. माझ्यामुळे तुम्हाला उगाच त्रास होतो. तुम्ही मला फेकून का देत नाही?हे

ऐकून सखूबाई हसल्या. त्यांनी हंड्याच्या भेगेवरून हात फिरवला आणि म्हणाल्या, अरे वेड्या हंड्या, तू रडू नकोस. जरा डोके वर करून त्या वाटेकडे बघ. हंड्याने मान वर करून बघितले. नदीपासून घरापर्यंत जाणाऱ्या वाटेच्या एका बाजूला सुंदर सुंदर फुलांची रांग होती. गुलाबी, पिवळी, पांढरी फुले वाऱ्यावर डोलत होती. फुलपाखरे त्यांच्यावर बसली होती.सखूबाई म्हणाल्या, गेली दोन वर्षे रोज तुझ्यातून गळणाऱ्या पाण्यामुळे ही फुले जगली आहेत. मी मुद्दाम तुला या बाजूला ठेवते. सकाळच्या उन्हात मी जेव्हा परत येते, तेव्हा या फुलांमुळे माझा सगळा थकवा जातो. गावातील मुले शाळेत जाताना ही फुले तोडून देवाला वाहतात. जर तू पूर्ण हंडा असतास, तर हा रस्ता असा सुंदर दिसला नसता.हे ऐकून भेगाळलेल्या हंड्याचे डोळे पाण्याने भरले. त्याला पहिल्यांदा आपल्या असण्याचे महत्व समजले. त्या दिवसापासून हंडा कधीच रडला नाही. उलट अभिमानाने आणखी चांगले पाणी गळवू लागला.

बोध : आपल्याला वाटते की आपल्यात काहीतरी कमी आहे, आपण इतरांसारखे परिपूर्ण नाही. पण प्रत्येकातील उणीवाही देवाने एखाद्या कारणासाठीच ठेवली असते. आपल्या कमतरता सुद्धा कधी कधी कोणासाठी तरी वरदान ठरतात. म्हणून स्वतःला कमी लेखू नका.

## आत्मशक्ति



### तो विश्वात सामावला आहे

दुसऱ्या कोणी आमच्या म्हणण्यानुसार वागावे या अपक्षेतून निर्माण होणारे ताणतणाव आणि चिंता वाहणाऱ्या ढगासारखे दिसेनासे होतात. त्याऐवजी आम्ही अंतरी परीपूर्ण होत जाऊन आपल्या संबंधांना समृध्द करीत त्यांचा आनंद घेऊ लागतो.

ध्यानधारणेसाठी बसा! तणाव विरहीत व्हा! ज्याची आठवण आल्यावर आपण शांत होतो आणि सुखसमाधान पावतो अशा माणसाला आठवा. त्या प्रेमाला आपल्या अंतरी अनुभवा. असेच प्रेम इतरांबद्दल निर्माण करा. प्रेम आपल्या कुटुंबियात, मित्रांत आणि सहकाऱ्यात प्रसारित करा. त्याला अधिक पुढे जाऊ द्या. त्या प्रेमाला पुढे दुसऱ्या माणसांपर्यंत, धर्मियांपर्यंत वा अन्य देशवासियांपर्यंत प्रसारीत करत चला, वाटत चला.

असा अभ्यास केल्याने, आपल्याला कळेल की, आपला आत्मा जगावर कसा प्रेम करतो ते. आणि शेवटी आपल्या अंतरी पूर्ण विश्वमंडळात सामावून द्या!

निर्भयता हे जागृत आत्म्याचे खास वैशिष्ट्य आहे. आत्म्याचा हा स्थायी भाव आहे. आत्मा शक्तीचे मूळ उगमस्थान असून कोणत्याही प्रकारची भीती त्याला माहित नाही. आम्ही आत्म्याच्या संपर्कात येऊन निर्भयतेमध्ये प्रवेश करतो. त्यामुळे भीती आणि संकटाचा सामना आम्ही नव्या उमेदीने आणि विश्वासाने करु शकतो.

आम्ही कितीही शक्तिशाली असू, पण आम्हाला काही विशिष्ट संकट, प्रसंगांना तोंड द्यावे लागते व त्यांचे आव्हान स्विकारावे लागते. आम्ही अशा काही संकटात सापडतो की त्यांच्यामुळे आम्ही दुर्बळ, शक्तिहीन आणि असहाय्य बनतो. कधी कधी आमचा मुलगा फार आजारी पडतो. त्याला आमच्या सहाय्याची गरज असते, पण त्याचे दुःख आम्हाला कमी करता येत नाही किंवा आमच्या घरी मानसिकदृष्ट्या असंतुलित संतती जन्माला येईल व त्या आजाराशी आम्हाला हयातभर धैर्याने व धाडसाने तोंड द्यावे लागेल. (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### सत्कर्म

सुरेश ओबेरॉय : निळ्या रंगात पांढरा रंग जास्त मिसळला तर निळा रंग फिकट व्हायला लागेल.

शिवानीदीदी हो, तुम्हाला एवढंच करायचंय. मी तुमच्याकडे पांढरा चेंडू पाठवायची वाट बघायची नाही. जर मी तुमच्याकडे निळ्या रंगाचे चेंडू पाठवत राहिले आणि तुम्ही माझ्याकडे पांढरे चेंडू पाठवत राहिलात तर एक दिवस मी तुमच्याकडे पाठवत असलेल्या चेंडूंचा रंग बदलेल. बदल करण्यासाठी मी जरी वेळ लावला तरी तुम्ही पाठवत असलेल्या चेंडूंचा रंग (विचारपद्धती) बदलेल हे महत्त्वाचं आहे.

सुरेश ओबेरॉय बरोबर.

शिवानीदीदी : माझ्या बाबतीत नकारात्मक विचार करण्याने तुमचं जे प्रचंड नुकसान झालं असतं त्यापासून तरी तुम्ही नक्कीच वाचाल. तुमची पूर्ण सहमती नसली तरीही माझ्या बाबतीत चांगला विचार करण्याचं तुम्ही उचललेलं एक छोटं पाऊल तुमचं ऊर्जाक्षेत्र हलकं करेल आणि मुधारेल.

सुरेश ओबेरॉय : सकारात्मक विचार करून मी चांगलं कर्महही करत असेन त्यामुळे माझं कार्मिक खातंही सुधारेल.

शिवानीदीदी हो, देवाण-घेवाण होणाऱ्या ऊर्जेची गुणवत्ता बदलली की सगळं बदलेल. ह्या कष्टांचा लक्षणीय फायदा म्हणजे तुम्हाला हलकं वाटेल, तुमची तब्येत चांगली होईल आणि इतर नात्यांमध्येही तुम्ही सहजतेने पांढरे चेंडू फेकू शकाल.

सुरेश ओबेरॉय : एकदा आपल्याला सवय लागली, की ते सोपं होईल. शिवानीदीदी समजा, एका नात्यामध्ये तुम्ही निळ्या रंगाच्या चेंडूंची देवाण-घेवाण करत आहात. म्हणजे तुमच्या मनाचा रंग निळा आहे. व्यक्ती कदाचित तुमच्याकडे पांढरा चेंडू फेकत असेल पण तरीही तुम्ही निळ्या रंगाचे दुसऱ्या एखाद्या नात्यातील चेंडूच निर्माण कराल कारण तो तुमचा रंग बनला आहे. सर्वसाधारणपणे, एखाद- दुसऱ्या नात्यामध्येच वाद असतात, सगळ्या नात्यांत नसतात. पण जर आपण ती एक-दोन नाती सुधारण्यासाठी कष्ट घेतले तर बाकीची नाती आपोआपच अजून समृद्ध होतील आणि आत्म्याची बॅटरी शक्तिशाली होईल.

जर आपण खराब मनःस्थितीत घरी आलो तर त्याचा घरातल्या इतर सदस्यांवर परिणाम होतो, तसंच आहे हे. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**मित्र :** मला रात्री झोपच येत नाही.
**मित्र :** डॉक्टर काय म्हणाले?
**मित्र :** झोपेच्या गोळ्या दिल्या, पण त्या घ्यायला रात्री उठावं लागतं

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* विषुववृत्त कोणत्या ३ महाद्वीपांमधून जाते?
– आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आशिया.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### भोपळा

६) मेंदूची दुर्बलता, मानसिक थकवा, विस्मरण, श्रम आणि भ्रम हे विकार तांबड्या भोपळ्याच्या सेवनाने कमी होतात. कारण हा भोपळा मधुर गुणात्मक असल्यामुळे मेंदूला पोषक असतो. याकरिता भोपळ्याचा हलवा करून खाल्ल्यास फायदा दिसून येतो. भोपळा किसून त्यामध्ये तूप, वेलची, साखर घालून हलवा बनवावा व रोज सकाळी अनुशापोटी हा हलवा नियमित खावा. ७) शरीराने कृश असलेल्या व्यक्ती, अशक्तपणा, खोकला, आम्लपित्त, रक्तप्रदर, हृदयरोग, क्षयरोग झालेल्यांनी तांबड्या भोपळ्याचा अवलेह खावा. याकरिता भोपळा सोलून कापावा व त्यातील मधला गर शिजवून तो तुपात परतावा. त्यानंतर त्यात साखर घालून अवलेह तयार करावा. अवलेह तयार झाल्यावर त्यामध्ये सुंठ, मिरी, पिंपळी, तमालपत्र, धणे, वेलची, दालचिनी ही प्रक्षेपक द्रव्ये प्रत्येकी अर्धा चमचा मिसळावीत. हा अवलेह नियमितपणे तीन महिने रोज सकाळ-संध्याकाळ एक चमचा खाऊन त्यावर गायीचे दूध प्यायल्यास वरील सर्व आजार बरे होतात. तसेच पचनशक्ती वाढून वजन वाढते. चेहरा तजेलदार व त्वचा कांतियुक्त होते.

ज्या स्त्रियांना मासिक पाळीमध्ये अति प्रमाणात रक्तस्राव होतो, तसेच त्या काळात अशक्तपणा जाणवून शरीराचा दाह होत असेल, तर अशा वेळी भोपळ्याचा रस खडीसाखर घालून सकाळ-संध्याकाळ अर्धा कप घ्यावा किंवा त्याचे सूप बनवून त्यात गायीचे तूप अर्धा चमचा टाकून प्यावे.

मूतखड्याचा त्रास जाणवत असेल, तर भोपळ्याचा रस चिमूटभर हिंग व जवखार घालून घेतल्यास मूतखडा विरघळून लघवीवाटे बाहेर पडतो. १०) भोपळ्याच्या बिया या कृमीनाशक असल्यामुळे कृमी झालेल्या बालकांना या बिया दुधात वाटून ते दूध गाळून त्यात थोडा मध टाकून प्यायला द्यावे. दूध प्यायल्यानंतर एक चमचा एरंडेल तेल पिण्यास दिल्यास पोटातील चपटे, गोल, लंबगोल, लांब असे सर्व कृमी शौचावाटे बाहेर पडतात. हा प्रयोग सलग तीन ते पाच दिवस करावा.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची

## भक्तीची पराकाष्ठा : 'संत कूर्मदास'

हात पाय नाही ज्यासी। तोही पाहे पंढरीसी।।
रांगता रांगता आला। देव भेटे कूर्मदासाला।।

वारकरी संप्रदायात असे अनेक संत होऊन गेले, ज्यांनी आपल्या भक्तीने, कर्तृत्वाने आणि ज्ञानाने ईश्वराला जिंकले. पण संत कूर्मदास यांचे चरित्र या सर्वांमध्ये अतिशय वेगळे, हृदयस्पर्शी आणि डोळ्यात पाणी आणणारे आहे. ज्या माणसाला निसर्गाने जन्मतःच परावलंबी केले, ज्याला समाजाने हिणवले, तो माणूस केवळ अंतःकरणातील भक्तीच्या जोरावर अध्यात्माच्या अशा शिखरावर पोहोचतो, जिथे पंढरीच्या जगन्नाथाला आपले विठ्ठल रूप सोडून, भक्तासाठी मैलोन्मैल धावत यावे लागते.



कूर्मदास महाराजांचा इतिहास हा केवळ एका अपंग भक्ताचा प्रवास नाही, तर तो मानवी इच्छाशक्तीचा, सोशिकतेचा आणि ईश्वरावरील अढळ विश्वासाचा जिवंत पुतळा आहे.

संत कूर्मदास महाराजांचा जन्म १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात (अंदाजे संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव महाराजांच्या समकाळात) सोलापूर जिल्ह्यातील पैठण (काही ठिकाणी याचा उल्लेख मराठवाड्यातील पैठण असाही येतो, परंतु बहुतांश संशोधक सोलापूर-उस्मानाबाद सीमेवरील किंवा लातूर परिसरातील गावाचा उल्लेख करतात) जवळील एका सात्विक कुटुंबात झाला.

कूर्मदास जन्माला आले तेव्हा त्यांचे शरीर पाहून माता-पित्यांच्या पायाखालची जमीन सरकली. त्यांना जन्मतःच दोन्ही हात नव्हते आणि दोन्ही पायही नव्हते. त्यांचे शरीर एका कासवासारखे (कूर्म) गोल आणि केवळ धडाचे होते. म्हणूनच त्यांचे नाव 'कूर्मदास' (कासवासारखा ईश्वराचा दास) असे ठेवण्यात आले.

त्या काळी अपंगत्वाला पूर्वजन्माचे पाप मानले जाई. कूर्मदासांना लहानपणापासूनच उपेक्षा, गरिबी आणि एकाकीपणाचा सामना करावा लागला. पण निसर्गाने त्यांना जरी हात-पाय दिले नसले, तरी एक अतिशय शुद्ध, निर्मळ आणि विठ्ठलमय अंतःकरण दिले होते.

लहानपणापासूनच कूर्मदासांच्या कानावर पंढरपूरच्या विठ्ठलाची महती पडत होती. वारकरी जेव्हा हातात टाळ-मृदंग घेऊन, 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल' असा गजर करत त्यांच्या गावावरून जात, तेव्हा कूर्मदासांचे डोळे भरून येत. त्यांना वाटायचे, 'सगळे जग त्या विठ्ठलाच्या दर्शनाला जाते, मग मीच का वंचित राहू? मला हात-पाय नसले तरी काय झाले, माझ्याकडे विठ्ठलाचे नाम घेणारी जीभ आहे आणि त्याला पाहू इच्छिणारे डोळे आहेत!'

एक वर्ष आषाढी वारी जवळ आली. गावातून दिंड्या पंढरपूरकडे निघाल्या. कूर्मदासांच्या मनातील विठ्ठल भेटीची ओढ एवढी तीव्र झाली की त्यांनी एका रात्री संकल्प केला-मी पंढरपूरला जाणार, माझ्या विठ्ठलाला डोळे भरून पाहणार!

हात-पाय नसलेला माणूस पंढरपूरला कसा जाणार? हा प्रश्न संपूर्ण गावाला पडला होता. पण कूर्मदासांनी कोणाचीही मदत मागितली नाही. त्यांनी स्वतःच्या शरीरालाच रथ बनवले.

कूर्मदास आपल्या पोटाच्या आणि पाठीच्या साहाय्याने जमिनीवर सरपटत, रांगत रांगत पंढरपूरच्या दिशेने निघाले. एखाद्या कासवाने जमिनीवरून सरकावे, तसे ते पुढे सरकत होते.

जमिनीवरचे दगड, धोंडे, काटे त्यांच्या शरीराला टोचत होते. उन्हाने तापलेली माती त्यांच्या पोटाला पोळत होती. काही अंतरावर गेल्यावर त्यांच्या पोटाची आणि छातीची कातडी सोलवटून निघाली, रक्ताच्या धारा वाहू लागल्या.

पण मुखात मात्र एकच गजर होता-विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल... दिवसाला ते जेमतेम काही मीटर किंवा एखादा किलोमीटरच पुढे सरकू शकत होते. त्यांना पैठणवरून पंढरपूरला पोहोचण्यासाठी महिन्यांचा कालावधी लागणार होता, पण त्यांच्या चिकाटी समोर निसर्गानेही गुडघे टेकले.

रांगत रांगत कूर्मदास एका गावी पोहोचले, जिथे वारकऱ्यांची मोठी दिंडी मुक्कामाला होती. त्या दिंडीचे नेतृत्व साक्षात संत शिरोमणी नामदेव महाराज करत होते. नामदेवांनी जेव्हा एका अपंग माणसाला रक्ताळलेल्या शरीराने, पोटावर रांगत विठ्ठल नामाचा जयघोष करताना पाहिले, तेव्हा नामदेवांचे डोळे पाणावले.

नामदेव महाराज धावत गेले, त्यांनी कूर्मदासांना उचलून आपल्या छातीशी लावले. नामदेव म्हणाले, कृष्णा, तुझी ही अवस्था! तू पंढरपूरला कसा पोहोचणार? आषाढी एकादशी तर काही दिवसांवर आली आहे आणि तुझे शरीर तर पूर्णपणे जखमी झाले आहे.

त्यावर कूर्मदास अत्यंत करुण स्वरात म्हणाले, नामदेव दादा, मला माहित आहे मी एकादशीपर्यंत पंढरपूरला पोहोचू शकणार नाही. माझे हे पापी शरीर मला साथ देत नाहीये. पण तुम्ही जेव्हा पंढरपूरला जाल, विठ्ठलाच्या गाभाऱ्यात उभे राहाल, तेव्हा त्या माझ्या पांडुरंगाला सांगा-'तुझा एक हात-पाय नसलेला कूर्मदास नावाचा चाकर पैठणवरून तुझ्या भेटीसाठी रांगत येत आहे. तो एकादशीला पोहोचू शकत नाही, पण त्याची भक्ती तुझ्या चरणी पोहोचली आहे.' एवढा निरोप माझा विठ्ठलाला द्या!

नामदेवांनी जड अंतःकरणाने कूर्मदासांचा निरोप घेतला आणि दिंडी पुढे निघाली. कूर्मदास मात्र तिथेच थांबले नाहीत, ते तसेच रक्ताळलेल्या शरीराने पुढे रांगत राहिले.

आषाढी एकादशीचा दिवस उजाडला. पंढरपूर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेले होते. संत नामदेव महाराज विठ्ठलाच्या मूर्तीसमोर उभे राहिले. महापूजा झाली, पण नामदेवांचे लक्ष विठ्ठलाच्या चरणांकडे आणि त्याच्या चेहऱ्याकडे होते. नामदेवांना जाणवले की, आज विठ्ठलाच्या चेहऱ्यावर ते नेहमीचे तेज नाही, देव आज उदास आणि व्याकुळ दिसत आहेत.

नामदेवांनी विठ्ठलाला विचारले, देवा, आज तुझा हा अवतार असा का? आज तर तुझा सर्वात मोठा सण आहे, तुझा लाडका वारकरी तुझ्या दारात आला आहे, मग तू असा कासावीस का आहेस?

तेव्हा विठ्ठलाच्या मूर्तीतून आवाज आला, नामदेवा, माझा खरा भक्त, ज्याचे हात-पाय नाहीत, तो पैठणवरून माझ्यासाठी पोटावर रांगत येत आहे. त्याचे शरीर रक्ताने माखले आहे. तो सध्या पंढरपूरपासून १४ मैल दूर असलेल्या 'लहूरी' (लोहोरे) या गावात येऊन थांबला आहे. त्याचे शरीर आता थकले आहे, तो पुढे येऊ शकत नाही आणि तो मला तिथेच बोलावत आहे. नामदेवा, मला आता इथे राहावत नाही, मी माझ्या भक्तासाठी चाललो!

साक्षात पंढरीनाथ, त्रिभुवनाचा मालक, आपल्या भक्ताच्या ओढीने देवळातून बाहेर पडला. विठ्ठलाने संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज यांना सोबत घेतले आणि ते तिघेही 'लहूरी' गावाच्या दिशेने धावत निघाले.

लहूरी गावाच्या वेशीवर, एका झाडाखाली संत कूर्मदास अत्यंत थकलेल्या अवस्थेत पडले होते. त्यांच्या शरीरात आता त्राण उरला नव्हता. त्यांना वाटत होते की आता आपले प्राण जाणार आणि विठ्ठलाचे दर्शन अधुरे राहणार. त्यांनी डोळे मिटले आणि विठ्ठलाचे ध्यान सुरू केले.

तितक्यात तिथे तीन मूर्ती प्रकट झाल्या-साक्षात पांडुरंग, ज्ञानेश्वर माऊली आणि नामदेव महाराज! विठ्ठलाने पाहिले, ज्या भक्ताला हात नव्हते, त्याने अंतःकरणाचे हात पसरले होते; ज्याला पाय नव्हते, त्याची भक्ती देवापर्यंत धावत आली होती.

विठ्ठल धावत पुढे गेला आणि त्याने कूर्मदासांच्या त्या मातीने आणि रक्ताने माखलेल्या शरीराला उचलून थेट आपल्या कवेत घेतले. देवाने स्वतःच्या पीतांबराने कूर्मदासांच्या अंगावरील धूळ आणि रक्त पुसले.

जसा भगवंताचा स्पर्श कूर्मदासांना झाला, तशा त्यांच्या शरीराच्या सर्व जखमा एका क्षणात नाहीशा झाल्या! त्यांच्या चेहऱ्यावर एक अलौकिक, दिव्य तेज प्रकट झाले.

कूर्मदासांनी डोळे उघडले, समोर साक्षात चतुर्भुज विठ्ठल उभा होता. कूर्मदासांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. ते म्हणाले, देवा, मी तर अपंग, मी तुझ्या दारात येऊ शकलो नाही, म्हणून तू स्वतः माझ्यासाठी चालत आलास? हे तुझे उपकार मी कसे फेडू?

विठ्ठल म्हणाला, कूर्मदासा, तुझी भक्ती पाहून माझे देवपण गळून पडले. तू पंढरपूरला येऊ शकला नाहीस, म्हणून मी पंढरपूरला तुझ्याकडे घेऊन आलो. आजपासून हे लहूरी गाव म्हणजेच 'दुसरी पंढरी' म्हणून ओळखले जाईल.

संत कूर्मदास महाराजांनी विठ्ठलाच्या कुशीतच आपल्या जीवनाचे सार्थक मानले. विठ्ठलाच्या दर्शनानंतर काही काळाने, त्यांनी याच लहूरी (लोहोरे, तालुका माढा, जिल्हा सोलापूर) या गावी समाधी घेतली.

आजही लहूरी या गावाला 'अपर पंढरपूर' किंवा 'प्रति पंढरपूर' असे म्हटले जाते. आषाढी एकादशीच्या दिवशी जितके महत्त्व पंढरपूरला आहे, तितकेच किंवा त्याहून अधिक भावपूर्ण महत्त्व लहूरी येथील संत कूर्मदास महाराजांच्या मंदिराला आहे. तिथे आजही कूर्मदासांची समाधी असून, त्या समाधीचे दर्शन घेतल्याशिवाय अनेक वारकऱ्यांची वारी पूर्ण होत नाही, अशी श्रद्धा आहे.

आजच्या काळात जेव्हा आपण छोट्या-छोट्या संकटांनी खचून जातो, एखादे अपयश आले की निराश होतो किंवा शरीराला साधे दुखापत झाली तरी देवाला दोष देतो, अशा वेळी संत कूर्मदास महाराजांचे चरित्र आपल्याला जगण्याची आणि लढण्याची नवीन दृष्टी देते:

जर मनात एखादी गोष्ट मिळवण्याची प्रामाणिक आणि तीव्र इच्छा असेल, तर शारीरिक अपंगत्व किंवा कोणतीही बाह्य अडचण तुम्हाला रोखू शकत नाही.

कूर्मदासांकडे अभिमान बाळगण्यासारखे काहीच नव्हते, त्यांनी स्वतःला संपूर्णपणे विठ्ठलाच्या चरणी वाहून घेतले होते. 'मी' पणाचा हाच त्याग ईश्वराला आकर्षित करतो. ईश्वर हा संपत्तीने, पैशाने किंवा शारीरिक सौंदर्याने मिळत नाही, तो मिळतो केवळ अंतःकरणाच्या आर्ततेने.

संत कूर्मदास महाराजांचे चरित्र म्हणजे वारकरी संप्रदायातील भक्तीचे एक सुवर्णपान आहे. देव भावाचा भुकेला असतो ही उक्ती कूर्मदासांनी आपल्या कष्टाने आणि रक्ताने सिद्ध करून दाखवली.

वाचकांनो, संत साहित्याचा हा अमूल्य ठेवा आणि ही अचूक माहिती जास्तीत जास्त वारकरी बांधवांपर्यंत, तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.

**संत शिरोमणी कूर्मदास महाराज की जय!**
**पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम**

आज अपंग नसतानाही अपंग आहोत असे कागदपत्रे दाखवून विविध सवलती घेणारे अनेक महाभाग आहेत, त्यांनी या थोर संतांचा आदर्श घ्यावा हीच श्री विठ्ठल चरणी प्रार्थना...



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## थोरपणाला मिरवू नको

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स




दारिद्य मुलखाचं अवसान मात्र बादशाहाचं अगदी इंद्रपदाला लाजवायच। इकडे भ्रष्टाचार करायचे, अन जोडायचे । तोऱ्यात मिरवायचे वर दुसऱ्यांना चिडवायचे, की हे म्हणे पुतळे प्रामाणिकपणाचे, महाभारतकालीही जनता अशीच वागायची. विदुरानंच सांगितलय ही परिस्थिती. अक्षुतश्च समुन्नदी दारिद्रश्च महामनी । अर्थाश्चकर्मणा प्रेप्सुः मुढ इत्युच्यते बुधैः ।।

दुसऱ्यांना मूर्ख ठरवणारी स्वतःच मूर्ख असतो, असे शहाणा म्हणतो. हे काय शोभले त्याला? सीमाच नाही. त्याच्या उद्धटपणाला जवळ नाही कवडी फुटकी, तरी वाजवतो स्वतःची टीमकी? त्याच्या फुशारकीची नाही गणती । मग मिळवतो पैसा भल्याबुऱ्या मार्गानं आणि फसतो आपल्या कर्मानं विदूर म्हणतात आणखी कोणतं उदाहरण हवं मूर्खपणाचं ?

कुणी मीठ. भाकरीच खात असेल, पण मनानं जगत असेल, आनंदात काळ घालवत असेल, तर त्याला जग मानेल. एवढंच म्हणेल. कर आणखी श्रम. प्रामाणिकपणानं बसव जम. पण करु नको असले वाईट धंदे. लावतील गळ्याला फंदे, कवी अनंत फंदीचा हा फटका ऐका ना।

मी मोठा शहाणा धनाढ्यातही । गर्वभार हा वाहू नको। एकाहून एक चढी जगामाजी थोरपणाला मिरवू नको।

अरे श्रीमंती मिळवावी, पण ती श्रमाने जोडावी. श्रम आणि श्रीमंती परस्परांना शोभावी. भ्रष्टाचाराने धन जमवले की सुख हवरलो। ऐका ही जगप्रसिद्ध लेखक ओ हेन्री यांनी लिहिलेली गोष्ट.

रात्री दहाची वेळ. एका बंद दुकानासमोर एक ऐटबाज माणूस उभा. गस्तीवर होता एक पोलीस, त्याला शोधायचा होता एक खुनी छायाचित्र होते त्याच्याजवळ खुन्याचे. पण हा कोण उभा बंद दुकानापुढे ? त्या खुन्यानं एका प्रामाणिक सज्जनाचा खून केला होता. पैशाच्या लोभामुळे पण रात्रीच्या वेळी बंद दुकानापुढे उभ्या माणसाबद्दल त्याला कुतूहल वाटलं. तो पोलीस त्यांच्याकडं गेला. त्याला त्याचा चेहरा नीट दिसला. पण त्या ऐटबाज माणसाचं मात्र पोलिसांकडे लक्ष नव्हतं. तो कुणाची तरी वाट पाहत होता. याच तारखेला याच ठिकाणी रात्री दहालाच तो त्याचा मित्र त्याला वीस वर्षानंतर भेटणार होता. शाळेत होते ते एकत्र। मग झाले वेगवेगळे. पण तेव्हाच त्यांनी ठरवले होते, वीस वर्षानंतर याच ठिकाणी ठरल्या वेळीच दिवशी भेटायचं त्यानं तसं उत्सुकतेनं भेटलेल्या पोलिसाला सांगितलेदेखील. पोलीस म्हणाला, पण आता दहा वाजून गेले. आता तो नाही आला तर? तो माणूस म्हणाला, असं होणार नाही, तो येणारच!

कोण आहे पण तों?

आहे असाच कुणीतरी हलक्या नोकरीवर लागलेला. कळवलूं होतं त्यानं मला. मी मात्र श्रीमंत झालोय खूप. पैसा हेच आपलं ध्येय होतं. आमचा मित्र नीतिमान ।

पोलिस हसला, पुढे गेला. तिकडून दुसरा उंच माणूस आला.

मीच तो तुझा मित्र, असं म्हणाला. पण त्यानं त्या श्रीमंताशी हात नाही मिळवला. उलट म्हणाला, तुला मी अटक केली आहे. तू खून केला आहेस पैशासाठी। त्या मघाच्या पोलिसनं ओळखलं होत तुला खुनी म्हणून आणि वीस वर्षापूर्वीचा तो मित्र म्हणजे पीच पोलिस होता. तो बरोबर दहा वाजता आला होता. पण तो गरीब पोलीसच राहिला. तू श्रीमंत झालास. तो बघ दूर उभा आहे. तिथं तुझा मित्र, वीस वर्षापूर्वीचा. त्यानंच मला पाठवलं तुला हातकड्या घालायला. त्याला नाही बरं वाटलं, की त्याचाच मित्र निघावा खुनी. अनीतीने भ्रष्ट मार्गानं मिळवावी त्यानं श्रीमंती.

**- किशोर गांधी**

# माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्षपदी सुनील भोर



श्रीगोंदा - श्रीगोंदा तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची सहविचार सभा नुकतीच मुरलीधर अण्णा होनराव विद्यालय, श्रीगोंदा येथे प्राचार्य बी. टी. मखरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी पुढील तीन वर्षांसाठी संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी सुनील भोर, सचिवपदी मधुकर सुपेकर, उपाध्यक्षपदी भीमराव आनंदकर व राम जंजिरे, सहसचिवपदी आप्पासाहेब वागसकर, खजिनदारपदी रमजान सय्यद, हिशोब तपासणीसाठी शिवाजी उदार, तंत्रस्नेही म्हणून दत्तात्रय राऊत, प्रसिद्धीप्रमुखपदी बाळासाहेब मुठे, महिला प्रतिनिधी म्हणून वर्षा भोईटे व नयना वाळके यांची निवड करण्यात आली. तसेच जिल्हा प्रतिनिधी म्हणून दिलीप काटे, राजेंद्र खेडकर, रमजान हवालदार व दिलीप पानसरे यांची निवड झाली.

मार्गदर्शक म्हणून सचिनराव लगड, बाळासाहेब सूर्यवंशी आणि विश्वनाथ शेलार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

या बैठकीस तालुक्यातील विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.या सभेचे सूत्रसंचालन रमजान हवालदार यांनी केले.

# नगर तालुक्यात २८ जुलैला रंगणार बैलगाडा (छकडी) शर्यतीचा थरार

## विजेत्यांवर होणार बक्षिसांचा वर्षाव

नगर - नगर तालुक्यात सलग चौथ्या वर्षी बैलगाडा शर्यतीचा थरार रंगणार असून, मंगळवारी (दि. २८ जुलै) भोरवाडी येथे नगर तालुका केसरी बैलगाडा (छकडी) शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या शर्यतीमध्ये विजेत्यांवर मोटारसायकल, इलेक्ट्रीक स्कुटी या वस्तूंसह रोख अशा लाखो रुपयांच्या बक्षीसांचा धुरळा उडणार आहे. न्यायालयाने बैलगाडा शर्यतीवरील बंदी हटवल्याने आता राज्यात व देशभरात बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जात आहे. मात्र, नगर तालुक्यात सलग चौथ्या वर्षापासून बैलगाडा शर्यतीचे आयोजन भोरवाडी येथील श्री. हनुमान सप्ताह यात्रा उत्सवानिमित्त राहुल जाधव युवा मंचच्या वतीने करण्यात येत आहे. मंगळवारी (दि. २८ जुलै) सकाळी ९ वाजेपासून बैलगाडा शर्यत सुरू होणार आहे. बैलगाडा शर्यतीत राज्यभरातील गाडा चालक भाग घेणार आहेत. दिवसभर चित्तथरारक शर्यतींचा थरार नागरिकांना पाहण्यास मिळणार आहे.

बैलगाडा शर्यतीला परवानगी मिळाल्यापासून नियम-अटींची पूर्तता करीत या शर्यती पार पडल्या जात आहेत. राज्यात ठिकठिकाणी शर्यतीच्या आयोजनामुळे ग्रामीण अर्थकारणावर अनुकूल परिणाम झाला आहे. शर्यतीच्या ठिकाणी लाखोंची उलाढाल होणार आहे तर बैलजोडीला पुन्हा महत्व प्राप्त होत आहे. खिलार बैलजोडीच्या किंमती या लाखोंच्या घरात गेल्या आहेत. अशातच नगर तालुक्यात भोरवाडी येथे आयोजित केल्या जाणाऱ्या या बैलगाडा शर्यतीबाबत मोठी उत्सुकता आहे.

अधिक माहितीसाठी राहुल जाधव युवा मंचचे विजय लोमटे (मो. ९७३०५१४१४१), अक्षय पानसरे (मो.७२७६७७६९७६) स्वप्नील वाळूंज (मो.९१४५४०१०१७), प्रतिक भोर (मो.९०२८२३०७०७), संदीप दांगट (मो. ९८८११६९३९६), शिवाजी दारकुंडे (मो. ९९२१८६०१९८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, भिंगार येथे आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या दिंडीचे स्वागत करताना शाळा समितीचे सदस्य.

# भिंगारमध्ये पर्यावरण रक्षणाचा संदेश देत नवीन मराठी शाळेची दिंडी

नगर - अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, भिंगार येथे आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात शालेय दिंडीचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण रक्षण आणि वनसंवर्धनाचा संदेश देणारी ही दिंडी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी मुखी हरिनामाचा अखंड गजर, हातात टाळ आणि कपाळी टिळा लावत वारकरी परंपरेचा आनंद अनुभवला. ज्ञानोबा-तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल अशा जयघोषांनी परिसर भक्तिमय झाला. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई, संत मुक्ताबाई आणि संत चोखामेळा यांच्या वेशभूषा साकारून वारकरी परंपरेचे दर्शन घडविले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वारकरी वेश परिधान केला होता, तर विद्यार्थिनींनी हिरव्या रंगाच्या साड्या नेसून वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला.

दिंडीचे शाळा समितीचे को चेअरमन रविंद्र बाकलीवाल, सदस्य संजय सपकाळ, जालिंदर बोरुडे, रुपेश भंडारी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला कळमकर, श्यामकुमार खेले, अनिता थोरात, शरद कातोरे, साधना किरतवाड, प्रज्ञा गायकवाड तसेच पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाचे संस्कार, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि सामाजिक मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

# समर्पण चातुर्मास २०२६ चा २६ जुलैला मंगल प्रवेश

## सहजोडे भक्तामर अनुष्ठानात ३ हजार जोड्यांचा सहभाग



नगर- संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील जैन समाजाचे लक्ष वेधून घेतलेल्या समर्पण चातुर्मास २०२६ अंतर्गत प्रविणऋषी महाराज आदि ठाणा-४ यांचा ऐतिहासिक मंगल प्रवेश सोहळा २६ जुलै रोजी विनायकनगर येथील बोरा फार्म्सपासून आनंदधामपर्यंत उत्साहात पार पडणार आहे. या सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून, देशभरातून मोठ्या संख्येने जैन भाविक अहिल्यानगरात दाखल होणार आहेत.

मंगल प्रवेशापूर्वी सकाळी ६.४५ वाजता बोरा फार्म्स येथे प्रविणऋषी महाराज यांच्या पावन सानिध्यात सहजोडे भक्तामर अनुष्ठान आयोजित करण्यात आले आहे. या अनुष्ठानात तब्बल ३ हजार जोड्या सहभागी होणार असून, त्यानंतर याच ठिकाणाहून मंगल प्रवेशाची शोभायात्रा प्रारंभ होईल.

या शोभायात्रेत देशभरातील विविध स्थानकवासी जैन श्रावक संघांचे पदाधिकारी, उपनगरातील जैन श्रावक संघांचे प्रतिनिधी, विविध सामाजिक संस्थांचे सदस्य, जैन समाजातील हजारो श्रद्धाळू भाविक तसेच मोठ्या संख्येने जैनेतर धर्मप्रेमी नागरिक सहभागी होणार आहेत. अर्हम विज्ञा परिवाराच्या १,००८ कलशधारी महिला, आगम मंडळाच्या १,००८ महिला, विविध युवक, युवती व महिला मंडळांसह हजारो भाविकांच्या सहभागामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय होणार आहे.

चातुर्मासाच्या चार महिन्यांत आयोजित करण्यात येणाऱ्या आध्यात्मिक, सांस्कृतिक, संस्कारवर्धक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध उपक्रमांची माहिती देणारे आकर्षक देखावे शोभायात्रेचे विशेष आकर्षण ठरणार आहे. परमपूज्य गुरुदेवांच्या प्रेरणेने अर्हम विज्ञा परिवाराच्या प्रशिक्षकांमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती या देखाव्यांद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक बोरा, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, महामंत्री आदेश चंगेडिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, खजिनदार विलास कटारिया तसेच समितीच्या सर्व विश्वस्तांनी अहिल्यानगरकरांना मोठ्या संख्येने मंगल प्रवेश सोहळ्यात सहभागी होऊन परमपूज्य गुरुदेवांचे स्वागत करण्याचे आवाहन केले आहे. तसेच चातुर्मास काळात विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि संस्कारमय उपक्रमांमध्ये सहभागी होऊन धर्मलाभ घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

या समर्पण चातुर्मासाचे प्रमुख लाभार्थी म्हणून अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईस्थित उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा यांच्यासह परग, प्रमिलाबाई, हेमराज बोरा व परिवार यांनी लाभ स्वीकारला असून, देशभरातील गुरुभक्तांनी या चातुर्मासात सहभागी होऊन देव-गुरू-धर्माची प्रभावना वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

या मंगल प्रवेश सोहळ्यास कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप तसेच राष्ट्रीय पाठशाळेचे प्रमुख विद्याधर काकडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे या ऐतिहासिक सोहळ्याचे वैभव अधिक वृद्धिंगत होणार असून, समर्पण, साधना, संस्कार, स्वाध्याय आणि समाजप्रबोधनाचा संगम ठरणारा हा चातुर्मास देशभरातील भाविकांसाठी विशेष पर्व ठरणार असल्याचा विश्वास समर्पण चातुर्मास समितीने व्यक्त केला आहे.

# सुनीता लोंढे यांना मराठी साहित्य विषयात पी.एच.डी.पदवी



सुनीता लोंढे यांना मराठी साहित्य विषयात पी.एच.डी.पदवी जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना मान्यवर.

नगर - अनुकूल कम्प्युटरच्या संचालिका तथा शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सुनीता मुकुंद लोंढे यांनी मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठाकडून पदवी जाहीर झाल्याचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले असून, त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सुनीता लोंढे यांनी अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. माहेश्वरी गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली 'गुलबर्गा (कर्नाटक) येथील अनुबंध नियतकालिकातील कथांचा विवेचक अभ्यास' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. मराठी साहित्याच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान असलेल्या या संशोधनातून अनुबंध नियतकालिकात प्रकाशित कथांमधील आशय, कथनशैली, साहित्यिक मूल्ये, सामाजिक वास्तव, मानवी संवेदना आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब यांचा चिकित्सक व सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधनामुळे मराठी कथासाहित्यातील एका महत्त्वपूर्ण नियतकालिकाच्या साहित्यिक योगदानाचे शास्त्रीय मूल्यमापन होण्यास मदत झाली असून, संशोधन क्षेत्रात हा अभ्यास उपयुक्त संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. साहित्य अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठीही हे संशोधन दिशादर्शक ठरणार असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

# ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात रंगला विश्रामबाग प्रशालेचा रिंगण सोहळा

नगर – आषाढी एकादशीनिमित्त अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, विश्रामबाग येथे बालदिंडी व रिंगण सोहळा पार पडला. पूर्व प्राथमिक वर्ग तसेच प्राथमिक शाळेतील ७०० हून अधिक विद्यार्थी या बालदिंडीत उत्साहाने सहभागी झाले. बाल वारकऱ्यांच्या विठ्ठल–विठ्ठल आणि ज्ञानोबा–तुकारामच्या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.


नवीन मराठी शाळा, विश्रामबाग येथे आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी व रिंगण सोहळा पार पडला.

पारंपरिक पद्धतीने विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्तीची विधिवत पूजा करून बालदिंडीला सुरुवात झाली. बालदिंडीसाठी विद्यार्थ्यांनी आकर्षक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. मुलांनी पांढरे शुभ्र पोशाख, गांधी टोपी, गळ्यात तुळशीच्या माळा, कपाळावर गंध–टिळा धारण केला होता, तर मुलींनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला. हातात टाळ, चिपळ्या घेतलेल्या बाल वारकऱ्यांनी अभंग आणि भक्तिगीतांच्या तालावर उत्साहात दिंडी काढली.

बालदिंडीचे विशेष आकर्षण ठरले ते विठ्ठल–रुक्मिणीची वेशभूषा, टाळ–मृदंगाचा गजर आणि बाल वारकऱ्यांचा उत्साह! विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा आपल्या निरागस आणि उत्स्फूर्त सहभागातून जिवंत केली. बाल वारकऱ्यांच्या शिस्तबद्ध रांगा, पारंपरिक वेशभूषा आणि भक्तिमय घोषणांमुळे शाळेच्या परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि उत्साह हा या सोहळ्याचा केंद्रबिंदू ठरला. यानंतर शाळेच्या प्रांगणात पारंपरिक पद्धतीने रिंगण सोहळा पार पडला. टाळ–मृदंगाचा निनाद, विठ्ठल नामाचा जयघोष आणि बाल वारकऱ्यांच्या उत्साहामुळे परिसरात अवघे पंढरपूर अवतरल्याचा अनुभव उपस्थितांना आला. रिंगण सोहळ्यात विद्यार्थ्यांनी शिस्त आणि उत्साहाचा सुंदर मिलाफ साधत वारकरी परंपरेचा आनंद अनुभवला. या प्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रशालेच्या मुख्याध्यापिका विद्या गांगर्डे, पूर्व प्राथमिक वर्गाच्या इन्चार्ज वनिता चौधरी, जितेंद्र निकम, पारुनाथ ढोकळे, लीना पाटोळे, अनिता तिवारी, शिवाजी कवडे, पूजा कराळे, मनिषा कांबळे, मयूर धाडगे, कविता धर्माधिकारी, अश्विनी क्षीरसागर, अंकिता नलगे, योगिता कासार, साक्षी टकले, वैभव मदने, ऋतिक देसाई, चंद्रकांत सोनवणे, विशाल देशपांडे, विशाल साबळे, पूजा पानपाटील, सोनाली झेंडे, पल्लवी गिरे, उषा लोखंडे आदी शिक्षक सहभागी झाले होते.

# विशेष मोहिमेद्वारे २६ जुलै रोजी घरोघरी जाऊन गणना पत्रके भरणार

## नगर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदारांना सहकार्य करण्याचे आवाहन

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत नगर शहर विधानसभा मतदारसंघात २६ जुलै रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घराघरात भेट देऊन मतदारांकडून गणना पत्रके भरून घेणार असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली.

मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत २० जुलै पासून आतापर्यंत नगर शहर विधानसभा मतदारसंघातील ३ लाख १५ हजार २६४ मतदारांपैकी १ लाख ९७ हजार ७४७ मतदारांची गणना पत्रके भरून घेण्यात आली असून, हे प्रमाण ६२.७२ टक्के आहे.

मतदारसंघातील अनेक मतदार शहरातील विविध भागांत वास्तव्यास असल्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे २६ जुलै रोजी विशेष मोहिमेअंतर्गत संबंधित मतदान केंद्रांवर बीएलओ उपस्थित राहून मतदारांकडून गणना पत्रके भरून घेणार आहेत.

ज्या मतदारांनी अद्याप गणना पत्रक भरून दिलेले नाही, त्यांनी आपल्या विधानसभा मतदारसंघातील संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून गणना पत्रक भरून द्यावे आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

# चातुर्मासानिमित्त २६ जुलैला प्रवीणऋषी महाराज यांचे पहिले निवासी शिबीर

नगर – आचार्यसम्राट आनंदऋषी महाराज यांचेशिष्य उपाध्याय प्रवीणऋषी महाराज यांचा सन २०२६ मधील चातुर्मास नगर येथील आनंदधाम येथे होत आहे. यानिमित्त २६ जुलै रोजी त्यांचे पहिले निवासी शिबीर केशर गुलाब मंगल कार्यालय येथे होणार आहे. तसेच २८ ते ३० जुलै दरम्यान अर्हम् पुरुषाकार मेडिटेशनचे ७२ तासांचे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.



आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक युगात जीवनातील चढ–उतारांमध्ये प्रत्येक क्षेत्रात ताण आहे. परीक्षेची भीती, आर्थिक अडचणी, भविष्याची चिंता, शारीरिक अस्वस्थता, गुंतागुंतीची नाती, कौटुंबिक तणाव, जबाबदाऱ्यांचे ओझे अशा विविध परिस्थितींमध्ये प्रत्येक व्यक्ती मानसिक व शारीरिकदृष्ट्या थकलेली दिसते. त्यामुळे मनुष्याला आंतरिक परितर्वन घडवून आणण्यासाठी ध्यानसाधना आवश्यक असते. आंतरिक परिवर्तन पंचतत्त्वांमुळे ऊर्जित होते. याच पंचतत्त्वांना रंग, मंत्र आणि आकाराच्या स्वरूपात अर्हम् पुरुषाकार मेडिटेशन साधना प्रक्रियेत संमिलित करण्यात आले आहे. पंचतत्त्वांची शक्ती ऊर्जेच्या रूपात आपल्या शरीरात असते. या साधनेद्वारे आपल्या भौतिक स्तरावर पंचतत्त्वांचा आणि आंतरिक स्तरावर पंचपरमेष्ठी गुणांचा विकास होतो. परिणामी, शारीरिक, मानसिक व भावनिक असंतुलन कमी होऊन शरीर स्वस्थ, मन मजबूत होते व आत्मविकासाची यात्रा सुरू होते. आंतरिक आत्मशक्तींचा विकास करून नकारात्मक नष्ट करुन जीवनाचा आनंद वाढवू शकतो. असा हा कोर्स २८ ते ३० जुलै रोजी केशर गुलाब मंगल कार्यालय येथे होणार आहे.

२७ जुलै रोजी सर्वांनी प्रवेश घ्यायचा आहे. तीन दिवसांच्या या निवासी शिबिरात पूर्णपणे आरामदायक, आल्हाददायक वातावरणात प्रवीणऋषी महाराज यांचे सान्निध्य व मार्गदर्शनाखाली हे शिबीर होणार आहे.

या शिबिरासाठी इच्छुकांनी ९११२२०१०१०, ७७७४९६७००१ या क्रमांकावर संपर्क साधून रजिस्ट्रेशन व नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरातून विचार, वर्तन आणि जीवन या तिन्हीमध्ये व्यक्ती परिवर्तन घडवून आणू शकतो. अवघ्या ७२ तासांत आपल्या आंतरिक जगाला अधिक समृद्ध आणि अधिक शक्तिशाली बनविण्याची कला शिकण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. १८ वर्षांवरील सर्व जाती–धर्मांतील बंधू–भगिनींसाठी हे शिबीर खुले राहील, असे आयोजकांच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त नय्यर विद्यालयात आकर्षक रिंगण सोहळा

नगर – येथील बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे दुर्गादेवी अमर चंद नय्यर विद्या मंदिर व श्रीमान बिशंबरदास अमरचंद नय्यर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा पार पडला. या दिंडीत बालगोपाळ आकर्षक वारकरी वेशभुषा परिधान करून सहभागी झाले होते.


नय्यर माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थी दिंडी काढून रिंगण करण्यात आले.

दिंडीचे ठिकठिकाणी नागरिकांनी उत्साहात स्वागत केले. विठू नामाचा गजर करीत विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडला. विद्यार्थी भगव्या पताका घेऊन दिंडीत सहभागी झाले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष काकाशेठ नय्यर, उपाध्यक्ष बापूराव आंधळे, सचिव बाळासाहेब पवार, खजिनदार भास्करराव गोरे, संचालिका जनाबाई पवार, नगरसेविका संध्याताई पवार, मुख्याध्यापक एकनाथ मोटे, माध्यमिकचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, माजी विद्यार्थी प्रदीप तागड उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष काकाशेठ नय्यर व सचिव बाळासाहेब पवार यांच्या हस्ते पालखी पूजन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी वारकरी वेशात आकर्षक असा रिंगण सोहळा सादर केला. रिंगण सोहळ्यानंतर शाळेतून दिंडीने प्रस्थान केले. पालखी नय्यर विद्यालय, नामदेव चौक, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड मार्गे बायजाबाई सोसायटीतील श्री विठ्ठल– रुक्मिणी मंदिरात गेली. दिंडीचे स्वागत नगरसेविका संध्याताई पवार व जनाबाई पवार यांनी केले.

यावेळी मंदिरात श्री पांडुरंगाची आरती माजी विद्यार्थी प्रदीप तागड, नगरसेवक बाळासाहेब पवार, बापूराव आंधळे, भास्करराव गोरे यांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाची महाप्रसादाने सांगता करण्यात आली. दिंडीत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वारकरी वेशातील विद्यार्थी व पालक सहभागी झाले होते.

# 'पंढरीची वारी' समतेची समृद्ध जीवनपद्धती' उलगडणारा निरीक्षणप्रधान मराठी लघुपट

नगर – आषाढी एकादशीचे औचित्य साधत रयत चित्र फिल्म्स प्रस्तुत 'दिंडी हा निरीक्षणप्रधान मराठी लघुपट २५ जुलै रोजी सकाळी ७ वाजता युट्यूब प्रिमियरद्वारे प्रथमच प्रदर्शित होत आहे. 'पंढरीची वारी' समतेची समृद्ध जीवनपद्धती' हा विचार केंद्रस्थानी ठेवून साकारलेला हा ३ मिनिटे ०८ सेकंदांचा लघुपट वारकरी परंपरेतील समता, सेवा, शिस्त, सहकार्य, परस्पर सन्मान, भक्ती आणि माणुसकीच्या मूल्यांचे प्रभावी दर्शन घडवतो.

या चित्रपटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे संपूर्ण चित्रीकरण एकाच सलग दृश्यात करण्यात आले आहे. कोणतेही कृत्रिम नाट्य, मुलाखती किंवा स्पष्टीकरणात्मक निवेदन न वापरता वास्तवदर्शी दृश्यांद्वारे प्रेक्षकांना प्रत्यक्ष पंढरीच्या वारीचा अनुभव देण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या लघुपटाचे संपूर्ण चित्रीकरण, संपादन आणि अंतिम मास्टरिंग स्मार्टफोनवर करण्यात आले आहे. मर्यादित साधनसामग्रीतही दर्जेदार आणि आशयप्रधान चित्रनिर्मिती करता येते, याचे हे उल्लेखनीय उदाहरण आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन भैरवनाथ वाकळे यांनी केले असून, निवेदनासाठी किरण डहाळे यांनी आवाज दिला आहे. चित्रपटाच्या समारोपात संत तुकाराम महाराजांचा आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने... हा अभंग समाविष्ट करण्यात आला असून, त्यामुळे चित्रपटाचा आशय अधिक प्रभावीपणे अधोरेखित होतो.

# आता १ हजार रुपयात २२ कॅरेट शुध्द सोने खरेदीची सुवर्णसंधी

**'एसजीके ई–गोल्ड' ॲपमधील नवीन सुविधेचा २५ जुलै रोजी शुभारंभ**

नगर – तब्बल ८९ वर्षांची विश्वसनीय सुवर्ण परंपरा असलेल्या अहिल्यानगर येथील एस.जी.कायगांवकर ज्वेलर्सने सध्याच्या डिजिटल युगाचे महत्त्व ओळखून काही वर्षांपूर्वी 'एसजीके ई–गोल्ड' हे मोबाईल ॲप सुरु केले. या ॲपला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. आता याच एसजीके ई गोल्ड ॲपव्दारे ग्राहक २२ कॅरेट शुद्ध सोन्याचीही खरेदी करू शकणार आहेत. किमान १ हजार रुपयांच्या पटीत डिजिटल स्वरुपात २२ कॅरेट सोन्याची खरेदी करता येणार आहे. पमधील या नवीन सुविधेचा शुभारंभ २५ जुलै रोजी उद्योगपती नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती सुभाष कायगांवकर यांनी दिली.

एसजीके ई गोल्ड ॲपमधील नवीन सुविधेबाबत अधिक माहिती देताना सागर कायगांवकर यांनी सांगितले की, एसजीके ई गोल्ड ॲपचा विस्तार करीत आता २२ कॅरेट शुध्द सोन्याची खरेदी डिजिटल स्वरूपात करण्याची संधी ग्राहकांना देण्यात आली आहे. यात दुकानातील चालू भावानुसार ग्राहकांना घरबसल्या २४ बाय ७ सोने खरेदी करता येईल. दररोज किमान १ हजार रुपयापासून २ लाखापर्यंतचे सोने खरेदी करता येणार आहे. भविष्यात सोने खरेदीचे नियोजन असणाऱ्यांना छोटी रक्कम नियमित गुंतवणूक करून सोने खरेदी करणे शक्य होणार आहे. याशिवाय दीर्घकालिन गुंतवणुकीसाठीही हे ॲप विश्वासार्ह तंत्रज्ञानासह १०० टक्के सुरक्षित आहे. सोनं सुरक्षित ठेवण्यासाठी होणारा लॉकरचा खर्चही वाचणार आहे. डिजीटल ॲपमुळे सोने पूर्ण सुरक्षित राहते. तसेच २४ बाय ७ कधीही सोने खरेदी किंवा विक्री करता येऊ शकते. या ॲपमधील खरेदी केले जाणारे सोने हॉलमार्क प्रमाणित आहे. सोन्याचे चालू भाव ॲपमध्ये लगेच पहायला मिळतात. सर्व प्रक्रिया मोबाईलवरून अतिशय सोप्या पध्दतीने सहज होते.

ग्राहकांना एसजीके ई गोल्ड ॲपमध्ये जमा केलेल्या सोन्याच्या बदल्यात १०० टक्के हॉलमार्क प्रमाणित २२ कॅरेट सोन्याचे दागिने वाढलेल्या सोन्याचे पैसे, जीएसटी व पूर्ण मजुरी भरुन घेता येतील. नियमित बचतीतून सुरक्षित व भविष्यात उपयोगी ठरणारी सोने खरेदीची सुवर्णसंधी या एसजीके ई गोल्ड ॲपमुळे उपलब्ध होत आहे. एसजीके ई गोल्ड ॲपव्दारे २४ कॅरेट शुध्द सोने व शुध्द चांदी खरेदीला संपूर्ण भारतातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. विश्वसनीयता व सुरक्षितिता याची पूर्ण हमी असल्याने ग्राहक मोठा प्रतिसाद देतात. याच सेवेचा विस्तार करीत आता २२ कॅरेट सोनेही या ॲपव्दारे खरेदी करता येणार आहे.

एस.जी.कायगांवकर ज्वेलर्सने ८९ वर्षांच्या वाटचालीत ग्राहकांना कायम सर्वोत्तम सुवर्ण सेवा देण्यावर भर दिला आहे. ग्राहकांनीही नेहमीच या दालनावर विश्वास व्यक्त केला आहे. मनपसंत डिझाईन, नाजूक कलाकुसर आणि शुध्द सोन्याच्या दागिन्यांची मोठी व्हरायटी या दालनाचे वैशिष्ट्ये आहे. विश्वासाची हीच परंपरा डिजिटल स्वरुपातही कायम राखण्यात आली आहे. आताची छोटी बचत भविष्यातील मोठा परतावा ठरणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी आपल्या मोबाईलवर एसजीके ई गोल्ड ॲप डाऊनलोड करुन या आधुनिक काळातील विश्वसनीय सुवर्ण सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एस.जी. कायगांवकर ज्वेलर्सच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९२२५२५२५९६.

# चिमुकल्यांचा दिंडी सोहळा साजरा

नगर – म. ए. सो. पूर्व प्राथमिक शाळेच्या बालवाडी विभागाच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त पर्यावरणपुरक दिंडी सोहळा साजरा करण्यात आला.



म. ए. सो. पूर्व प्राथमिक शाळेच्या बालवाडी विभागाच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त पर्यावरणपुरक दिंडी सोहळा साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या हातात घोषवाक्यचे फलक देण्यात आले. काही विद्यार्थी विठ्ठल, रुक्मिणी, काही संत व सर्व विद्यार्थी वारकऱ्यांची वेशभूषेत या दिंडीत सहभागी झाले होते. काही विद्यार्थ्यांच्या हातात झेंडे, टाळ, डोक्यावर तुळस देण्यात आले. तसेच सर्व पालक मोठ्या संख्येने पारंपारिक वेशभूषा साकारून दिंडीमध्ये सहभागी झाले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक दशरथ गुंड उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी बालवाडी विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले. सहशिक्षक प्रिती कोष्टी, प्रतिक्षा राजेभोसले आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी या सोळ्यासाठी परिश्रम घेतले.


रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी काढण्यात आली.

# आषाढी एकादशीनिमित्त रेसिडेन्शिअल हायस्कूलची बालदिंडी उत्साहात संपन्न

नगर – आषाढी एकादशीनिमित्त रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये बालदिंडीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ–मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल–रुक्मिणीच्या जयघोषात आणि अभंग–भजनांच्या सुरावटीत दिंडीत सहभाग घेतला.

शाळेच्या परिसरातून काढण्यात आलेल्या या बालदिंडीत विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांच्या विचारांचा जागर करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. विठ्ठल–रुक्मिणी, वारकरी, संत यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

या प्रसंगी मुख्याध्यापक विजय जाधव यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार आणि आषाढी एकादशीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संतांच्या शिकवणुकीतून सदाचार, शिस्त, भक्ती आणि सामाजिक ऐक्याचे मूल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपमुख्याध्यापक भाऊसाहेब पवार, पर्यवेक्षक धनंजय म्हस्के, शरद सोनवणे, वैशाली मरकड तसेच शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला असून उपस्थित पालक व ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# मानवी जीवनात वास्तुशास्त्राचे अनन्य साधारण महत्व

आपली संस्कृती ही आपल्या सर्व पुरातन शास्त्रांशी निगडित आहे. शास्त्र वातावरणाच्या अनुषंगाने तयार झालेल्या जीवनशैलीशी निगडित आहेत. त्यामुळे आपलं आपल्या संस्कृतीशी असलेलं नातं अगदी गुळपिट जमल्यासारखं आहे, एकजिनसी आहे त्यामुळेच आपण पाश्चिशमात्य जीवनशैलीचे कितीही अनुकरण करून आपली जीवनशैली बदलायचं प्रयत्न केला तरी सुद्धा ते शक्य होत नाही. त्यात एक अर्धवट अवस्था येते. आपली अवस्था 'ना घर का न घाट का' अशी संस्कृती भविष्यात घडू नये यासाठीच शास्त्रांचा आधार घेत जीवन सुसह्य करणं, मनुष्य जीवनाचा उपभोग घेणं, आनंद घेणं हाच व्यवहारिक गुढ अर्थ शास्त्रांमध्ये दडलेला आहे. आपण कितीही नास्तिक झालो तरी आपल्यातले कुळ आणि गोत्र हे जाऊ शकत नाही.

वास्तुशास्त्रात पृथ्वीच्या जन्मापासूनच्या वातावरणाचा अभ्यास असल्यामुळे दिशा,उपदिशा आणि पंचमहाभूत आणि मनुष्य आणि परिसर यांच्यात एक वेगळेच नातं निसर्गतः तयार झालेला आहे. त्यामुळे दिशांच्या, उपदिशांच्या गुणदोषांचा परिणाम मानवी जीवनावर होतो. दिशांमध्ये उर्जेचा स्त्रोत आहे, तर उपदिशांमध्ये त्या दिशेतल्या ऊर्जेची चांगली अथवा वाईट ही शक्ती एकवटलेली आहे. उदाहरणार्थ पूर्व दिशा ही अग्नी तत्वाची आहे. तर या अग्नी तत्वाचे बळ जे दूरदृष्टी, चयापचय क्रिया, सुरुवात, ऐश्वआर्य सौख्य, आरोग्य या चांगल्या अर्थातून प्रकट होताना आग्नेय दिशेतून आपल्याला अनुभवता येते. आपल्याला होणारे तीव्र दुःख, डिप्रेशन हे सुद्धा अनुभवायला जेव्हा येते तेव्हा या अग्नितत्त्वातच दोष निर्माण झालेला असतो. इतके हे शास्त्र सत्य आहे. एक प्रकारे हा पूर्व दिशेचा आशीर्वादच म्हणता येईल.

दक्षिण दिशा ही पृथ्वी तत्वाची आहे. तर या पृथ्वीतत्वाच्या शक्तीचे स्वरूप आपण चित्ताचे स्थिरत्व, यशस्वी कौटुंबिक आणि सामाजिक जीवन, पुढील पिढीसाठी स्वतःच अस्तित्व सन्मानाने राखत भरीव योगदान देणं, जीवनातल्या अनेक घटनांचा निखालस आनंद प्राप्त करून घेणे हे पृथ्वीतत्त्वाचे मनुष्य जातीला असलेले अमृतमय वरदान आपल्याला या पृथ्वी तत्वाच्या उपदिशातून म्हणजेच नैऋत्य दिशेतून प्राप्त होताना आपण अनुभवतो. अचानक होणारे मृत्यू, खूप प्रयत्नांना यश न येणे, वैवाहिक जीवनात असफलता, सामाजिक स्थिती कमकुवत असणे हे ह्या दिशेचे एक प्रकारे आपल्याला मिळालेला शापच आहे असे म्हणता येईल.

पश्चिम दिशा ही वायू तत्वाची आहे. पवनाचा आशीर्वाद या दिशेवर आहे. या वायु तत्वाचे गुण आपल्याला 'शब्द' रूपाने अनुभवता येतात. शाब्दिक सुसंवाद, आदर, बुद्धी चातूर्य, कौटुंबिक आणि सामाजिक सलोख्याचं नातं म्हणजे पश्चिमेचा आशीर्वाद. वायव्य या उपनिषेतून प्राप्त होताना आपल्या लक्षात येते.

पण बिघडलेले नातेसंबंध, कौटुंबिक विसंवाद, घरातील स्त्री संतती विषयी असणारे विचित्र प्रश्नय, कोणत्याही मुद्यांवर दीर्घकाल किंवा पिढ्यानपिढ्या चालत असलेली भांडणं अथवा शाब्दिक वार हा ह्या पश्चिमेच्या दोषांचा परिपाक आहे.

उत्तर दिशा ही जलतत्त्वाची दिशा आहे. जलतत्त्व हे मनाशी जसे निगडित आहे तसेच ते इच्छापूर्तीशी सुद्धा निगडित आहे. कारण इच्छापूर्ती झाली तरच मनापासून आनंद होतो. मनोईच्छित कामना पूर्ण झाली तरच कामनेची पूर्तता होते. आरोग्य, पैसा, आयुष्यात येणाऱ्या सुसंधी, इच्छापूर्ती या उत्तरेच्या उर्जेच्या परिणामांचा आशीर्वाद आपल्याला आपल्या वास्तूमधल्या ईशान्य या उपदिशात प्राप्त होतो.

म्हणूनच आपल्या संस्कृतीत चौसोपी बांधकाम ाला, चौसोपी बांधकाम रचनेला असलेले महत्त्व हे अबाधित आहे. म्हणूनच वास्तुशास्त्रात उपदिशातल्या दोषाला असाधारण महत्व प्राप्त झालेलं आहे. भवनाची रचना करताना या सर्व बाबींचा जरा तरी विचार केला गेला, मेळ घातला गेला, तरी आपल्या संकल्पित आनंदाची पूर्ती करता येणे शक्य आहे. जेणेकरून आपल्या वास्तूपेक्षा 'आपलं स्वतःचं एलिवेशन' हे अधिक खुलणारं असेल.

वास्तू रचना करताना, भवन निर्मिती करताना, तसेच अंतर्गत सजावटीच्या बाबतीत विचार करताना, डिझाईन करताना अशा अनेक छोट्या, छोट्या गोष्टींचा वास्तुशास्त्रीयदृष्ट्या मोठा परिणाम आपण साधू शकतो आणि अनुभवू शकतो. उदाहरणार्थ एखाद्या भवनाच्या उत्तर–ईशान्य–पूर्व प्रभागातून प्रकाशाची योजना केली तर दक्षिण नैऋत्य पश्चिणम प्रभागातून त्यामानाने प्रकाशाचे संयोजन करूनही दिशांचा गुणात्मक अनुभव खेळत्या हवेच्या माध्यमातून घेता येऊ शकतो.

वास्तुशास्त्रीय नियम अवघड मुळीच नाहीत मात्र या शास्त्र विषयी कंटाळा करणारे बहुसंख्य बांधकाम कर्ते आपल्याला पाहायला मिळतात. त्याचे मूळ कारण म्हणजे शास्त्र विषयी बिलकुल नसलेला अभ्यास, तसेच असलेले गैरसमज आणि भिती. हे गैरसमज आणि भीती कायमची जाण्यासाठी अभ्यास, निरीक्षण आणि अनुमान याची गरज आहे. पण आजकाल या बाबींकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे किंवा कायमच या बाबी दुर्लक्षित ठेवल्या गेलेल्या आहेत आणि त्याचा विपरीत सामाजिक परिणाम आपण सर्वत्र अनुभवत आहोत.

**– डॉ. कौस्तुभ काळे,**
**वास्तु वाचस्पती, अहिल्यानगर**
**मो. ९८५०९४१८८१**

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता



## बेडकांची जगावेगळी त्वचा

बेडूक आणि इतर उभयचर प्राणी श्वास घेण्यासाठी केवळ फुफ्फुसांवर अवलंबून नसतात. त्यांच्या त्वचेत एक खास रचना असते, ज्यामुळे ते ऑक्सिजन आणि पाण्याची देवाणघेवाण करू शकतात. बेडकाची त्वचा अत्यंत गुंतागुंतीची असते: ती पातळ असते, त्वचेला ओलसर ठेवण्यासाठी श्लेष्म निर्माण करणाऱ्या ग्रंथींनी झाकलेली असते आणि हवेचे रेणू आत शिरू शकतील इतकी सच्छिद्र असते.

न्यूयॉर्कमधील अमेरिकन म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्रीचे क्युरेटर आणि हर्पेटोलॉजिस्ट क्रिस्टोफर रॅक्सवर्थी यांनी सांगितले, 'ऑक्सिजन आत जाण्यास आणि पाणी शोषले जाण्यास मदत होईल अशा पद्धतीने त्यांची त्वचा तयार केलेली असते.' कनेक्टिकट विद्यापीठातील उत्क्रांती जीवशास्त्रज्ञ कर्ट श्वेंक यांच्या स्पष्टीकरणानुसार, त्वचेच्या अगदी खाली असलेल्या लहान रक्तवाहिन्यांचे जाळे थेट पाणी किंवा हवेतून ऑक्सिजन शोषून घेते आणि कार्बन डाय ऑक्साईड शरीराबाहेर टाकण्यास मदत करते. या प्रक्रियेला 'त्वचेद्वारे श्वसन' म्हणतात.

रॅक्सवर्थी यांनी याबद्दल अधिक स्पष्ट करताना सांगितले की, 'ही खऱ्या अर्थाने फुफ्फुसांच्या प्रणालीसारखीच आहे.' बेडूक फुफ्फुसे आणि तोंडाच्या आतील आवरणातूनही श्वास घेऊ शकतात; परंतु त्वचेद्वारे श्वसनामुळे ते पाण्याखाली आणि दीर्घकाळच्या शीतनिद्रेमध्ये जगू शकतात. श्वेंक म्हणतात, 'जवळपास कोणताही प्रयत्न न करता, त्यांची त्वचा फक्त ओलसर ठेवल्यास आणि त्यात काही रक्तवाहिन्या असल्यामुळे, त्यांना आवडले किंवा न आवडले तरी त्यांच्या त्वचेतून वायू आणि पाण्याची देवाणघेवाण होत राहते.' तथापि, सर्व बेडूक त्वचेद्वारे श्वसनावर समान प्रमाणात अवलंबून नसतात.

दुसरीकडे, बेडकाच्या पिल्लांमध्ये गिल विकसित झालेले नसतात, त्यामुळे त्यांना जगण्यासाठी पृष्ठभागावरून हवा श्वासामध्ये घ्यावी लागते. परंतु, नुकतेच अंड्यातून बाहेर पडलेली पिल्ले पाण्याच्या पृष्ठभागावरील ताण तोडून हवा घेण्यासाठी खूप लहान असतात. त्याऐवजी, ती स्वतःचे हवेचे बुडबुडे तयार करतात. २०२० च्या एका अभ्यासात, श्वेंक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी निरीक्षण केले की बेडकाची पिल्ले पृष्ठभागाच्या अगदी खाली पोहतात, जिथे ते झपाट्याने हवा आत शोषून एक बुडबुडा तयार करतात. त्यानंतर, ते हा हवेचा बुडबुडा त्यांच्या फुफ्फुसात ढकलतात.

## थंडीतही उबदार राहणारे घर

वाढती थंडी आणि घरांना उबदार ठेवण्यासाठी होणारा विजेचा प्रचंड खर्च यावर अमेरिकेतील कोलोरॅडो बोल्डर युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी एक अनोखा उपाय शोधला आहे. त्यांनी 'मोची' नावाचा एक नवीन पारदर्शक पदार्थ तयार केला आहे, जो खिडक्यांमधून होणारी उष्णतेची गळती रोखून घराचे तापमान राखण्यास मदत करेल.

जगभरात वापरल्या जाणाऱ्या एकूण ऊर्जेपैकी सुमारे ४० टक्के ऊर्जा इमारतींना गरम ठेवण्यासाठी खर्च होते. मात्र, खिडक्यांच्या काचांमधून घरातील उष्णता सहज बाहेर पडते आणि बाहेरची थंडी आत येते, ज्यामुळे घर गरम ठेवण्यासाठी सतत हीटर वापरावे लागतात. 'मोची' हेच रोखण्याचे काम करते. 'मोची' ही एक सिलिकॉनवर आधारित शीट आहे. शास्त्रज्ञांनी याचे वर्णन एका विशेष प्रकारच्या 'बबल रॅप'सारखे केले आहे. या शीटमध्ये मानवी केसांपेक्षाही अनेक पटींनी पातळ अशी नळीसारखी छिद्रे असतात.

या छिद्रांमधून हवेचे कण एकमेकांवर आदळण्याऐवजी छिद्रांच्या भिंतींवर आदळतात. यामुळे उष्णतेचे वहन थांबते. केवळ ५ मिलीमीटर जाडीची ही शीट इतकी प्रभावी आहे की, जर तुम्ही ही शीट आगीसमोर धरली आणि मागे हात ठेवला, तरी हाताला चटका बसत नाही. ही शीट बनवण्यासाठी 'सर्फेक्टंट' अणूंचा वापर सिलिकॉनच्या द्रावणात केला जातो. हे अणू आपोआप धाग्यांसारखी रचना तयार करतात आणि सिलिकॉन त्याभोवती चिकटते. नंतर सर्फेक्टंट काढून त्या जागी हवा भरली जाते, ज्यामुळे अतिसूक्ष्म नळ्या तयार होतात.

बाजारात सध्या मिळणाऱ्या इन्सुलेशन फिल्म्स लावल्यामुळे खोलीत अंधार होतो किंवा बाहेरचे दृश्य नीट दिसत नाही. मात्र, 'मोची' पूर्णपणे पारदर्शक असल्याने खिडकीचा नजारा बिघडत नाही आणि सूर्यप्रकाशही पुरेसा येतो. संशोधक इवान स्माल्युख यांच्या मते, या तंत्रज्ञानामुळे बाहेरील हवामान कसेही असले, तरी घरातील तापमान आरामदायक ठेवण्यासाठी जास्तीची वीज खर्च करावी लागणार नाही. सध्या हे तंत्रज्ञान प्रयोगशाळेत विकसित केले जात असून, यासाठी लागणारा कच्चा माल स्वस्त आहे. लवकरच याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू होण्याची शक्यता आहे.



## डिट्टो महिलेसारखा रोबो

चीनच्या 'नोएटिक्स' या कंपनीने 'हॉब्स डब्लू १' नावाचा एक प्रगत ह्युमनॉईड (मानवी रूप असलेला) रोबो लॉंच केला आहे. हा रोबो विशेषतः सेवा क्षेत्रातील कामांसाठी विकसित करण्यात आला असून, तो भावना समजू शकतो आणि लोकांशी संवादही साधू शकतो.

या रोबोचा चेहरा 'बायोनिक' तंत्रज्ञानाने बनवला असून त्यावर मानवी त्वचेसारखी दिसणारी त्वचा बसवण्यात आली आहे. 'हॉब्स डब्लू १'चे हात 'सिक्स डिग्री ऑफ फ्रीडम' सह बनवले आहेत, म्हणजेच ते सर्व दिशांना फिरू शकतात. यामुळे हा रोबो वस्तू पकडणे, इशारा करणे किंवा छोटी-मोठी कामे सहज करू शकतो. हा रोबो पाहुण्यांचे स्वागत करू शकतो आणि त्यांना रस्ता दाखवू शकतो. यावर एक मोठी स्क्रीन देखील आहे, ज्याद्वारे तो आपल्या भावना व्यक्त करतो. हा रोबो हॉटेल, दुकाने, शाळा आणि कार्यालयांमध्ये 'रिसेप्शनिस्ट' म्हणून उत्तम काम करू शकतो.





तो स्वतःहून खोल्यांचे नकाशे तयार करू शकतो आणि कोणाच्याही मदतीशिवाय अडथळ्यांमधून वाट काढत फिरू शकतो. कंपनीच्या मते, हा रोबो माणसांची जागा घेणार नसून केवळ त्यांच्या कामात मदत करेल. नोएटिक्स कंपनीने यापूर्वी 'बूमी' नावाचा लहान मुलाच्या आकाराचा स्वस्त रोबो लॉंच केला होता. ह्युमनॉईड रोबोंच्या किमती लाखो रुपयांमध्ये असतात, मात्र नोएटिक्सने स्वतःचे पार्टसब आणि वजनाने हलके साहित्य वापरून या किमती कमी केल्या आहेत. या कंपनीला नुकताच ४१ दशलक्ष डॉलर्सचा निधी मिळाला असून, त्याद्वारे त्यांना ह्युमनॉईड रोबो प्रत्येक घराघरांत पोहोचवायचे आहेत.

## विमानाएवढ्या पंखांचा पक्षी

कल्पना करा की, तुम्ही एका मोकळ्या मैदानात उभे आहात आणि अचानक तुमच्या डोक्यावरून विमानासारखी एक प्रचंड सावली जाते. वर पाहिल्यावर तुम्हाला एखादे छोटे विमान नव्हे, तर चक्क एक पक्षी दिसतो! ही कोणतीही कल्पना नसून लाखो वर्षांपूर्वीची वस्तुस्थिती आहे. शास्त्रज्ञांनी अशाच एका महाकाय पक्ष्याचा शोध लावला आहे, ज्याचे नाव आहे 'अर्जेंटाविस'. निसर्गाने उड्डाणाच्या शक्तीचा वापर कोणत्या टोकापर्यंत केला होता, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

या पक्ष्याचे पूर्ण नाव 'अर्जेंटाविस मॅग्निफिसन्स' (Bgentavir Magnifibenr) असे आहे. संशोधनानुसार, हा पक्षी सुमारे ७० लाख वर्षांपूर्वी सध्याच्या अर्जेंटिना परिसरात आढळत असे. या पक्ष्याच्या पंखांचा विस्तार तब्बल २३ फूट इतका होता, जो आजच्या कोणत्याही पक्ष्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. सुमारे ७० किलो वजनाचा हा पक्षी जेव्हा जमिनीवर उभा राहायचा, तेव्हा त्याची उंची ६.५ फूट असायची. अर्जेंटाविसचे वजन खूप जास्त असल्यामुळे तो लहान पक्ष्यांप्रमाणे वारंवार पंख फडफडू शकत नव्हता.



उडण्यासाठी तो 'थर्मल सोरिंग' तंत्राचा वापर करायचा. म्हणजे, जमिनीवरून वर येणाऱ्या गरम हवेच्या प्रवाहावर आपले विशाल पंख पसरवून तो स्वार व्हायचा. त्याच्या पंखांचे एकूण क्षेत्रफळ ९१ चौरस फूट होते, ज्यामुळे त्याला हवेत तरंगणे सोपे जात असे. या पक्ष्यासाठी सर्वात कठीण काम म्हणजे जमिनीवरून हवेत झेप घेणे आणि पुन्हा खाली उतरणे. शास्त्रज्ञांच्या मते, उड्डाण करण्यासाठी याला ताशी किमान ४० किमी वेगाची गरज भासत असे. हवेत झेप घेण्यासाठी हा पक्षी वाऱ्याच्या दिशेने वेगाने धावायचा किंवा एखाद्या उतारावरून धावत जाऊन उड्डाण करायचा, अगदी आजच्या ग्लायडर किंवा विमानाप्रमाणे. हा आतापर्यंतचा शोधलेला सर्वात मोठा उडणारा शिकारी पक्षी मानला जात आहे. त्याच्या हाडांच्या अवशेषांवरून शास्त्रज्ञांना त्याच्या वेगाचा आणि जीवनशैलीचा उलगडा झाला आहे.

## ओमानच्या सुलतानांचे शाही जीवन : ४५०० कोटींची यॉट, दुर्मीळ मोटारी

ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक यांची आणि त्यांच्या विलासी जीवनशैलीची जगभरात चर्चा आहे. अल बु सईद राजवंशाचे वारसदार असलेले सुलतान हैथम यांच्याकडे अफाट संपत्ती आहे. त्यामध्ये ४५०० कोटी रुपयांची यॉट तसेच अनेक दुर्मीळ मोटारींचा समावेश आहे.

११ ऑक्टोबर १९५५ रोजी मस्कतमध्ये जन्मलेल्या हैथम बिन तारिक यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या पेम्ब्रोक कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केले आहे. २०२० मध्ये माजी सुलतान काबूस यांच्या निधनानंतर, त्यांनी एका सीलबंद लाल लिफाफ्यात वारसदार म्हणून हैथम यांचे नाव लिहून ठेवले होते. त्यानुसार, कोणत्याही वादाशिवाय हैथम बिन तारिक ओमानचे सुलतान बनले. सुलतान हैथम यांच्याकडे जगातील दुसरी सर्वात मोठी सुपरयॉट आहे, जिचे नाव 'फुल्क अल सलामह' आहे. ४,५०० कोटी रुपये किंमत असलेल्या या यॉटच्या देखभालीसाठी वर्षाला सुमारे ४५१ कोटी रुपये खर्च केले जातात.

याशिवाय त्यांच्याकडे 'अल सैद' नावाची दुसरी आलिशान यॉट देखील आहे, ज्यात खासगी चित्रपटगृह आणि वैद्यकीय कक्ष उपलब्ध आहेत. सुलतान यांच्या ताफ्यात १३० वर्षे जुन्या वाफेवर चालणाऱ्या कारपासून ते जगातील दुर्मीळ फेरारी आणि रोल्स रॉयस गाड्यांचा समावेश आहे. तसेच त्यांच्याकडे मर्सिडीज-मेबॅक आणि बेंटले यांसारख्या महागड्या गाड्याही आहेत. ओमानच्या शाही तबेल्यात १००० पेक्षा जास्त अस्सल अरबी घोडे आहेत. घोडेस्वारीची ही परंपरा त्यांना वारशाने मिळाली आहे. सुलतान यांच्याकडे सहा भव्य राजवाडे आहेत. यात २०० वर्षे जुना 'अल आलम पॅलेस' सर्वाधिक प्रसिद्ध आहे.



सोन्यासारख्या पिवळ्या आणि निळ्या रंगाची छटा असलेला हा राजवाडा सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. तसेच १९७२ मध्ये बांधलेला पांढऱ्या संगमरवरी 'फ्लॅग पॅलेस' हे त्यांचे अधिकृत निवासस्थान आहे. सुलतान आपल्या खास पाहुण्यांना ओमानचे शाही चिन्ह असलेल्या अत्यंत महागड्या 'रोलेक्स' घड्याळांची भेट देण्यासाठी ओळखले जातात. सुलतान हैथम यांची पत्नी अहाद बिन्त अब्दुल्ला या ओमानमधील महिला सक्षमीकरणाचे प्रतीक मानल्या जातात. सुलतान यांनी २०२१ मध्ये आपला मोठा मुलगा सैयद थेयाजिन याला 'क्राऊन प्रिन्स' (उत्तराधिकारी) म्हणून घोषित केले आहे.

## स्कॅम, फ्रॉड कॉल्सचा कायमचा बंदोबस्त

तुम्ही सुद्धा वारंवार येणाऱ्या विमा पॉलिसीच्या कॉल्समुळे किंवा अनोळखी फसव्या फोनमुळे त्रस्त आहात का? तर तुमच्यासाठी एक दिलासादायक बातमी आहे. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडिया (TRAI)) ने बनावट कॉल्स आणि फ्रॉड रोखण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. आता सर्व विमा कंपन्यांना त्यांचे सर्व्हिस आणि ट्रांझॅक्शन कॉल्स करण्यासाठी '१६००' ने सुरू होणारी नंबर सीरिज वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

ट्रायच्या नवीन आदेशानुसार, खठउअख (भारतीय विमा विनियामक आणि विकास प्राधिकरण) अंतर्गत येणाऱ्या सर्व विमा कंपन्यांना आता त्यांच्या ग्राहकांशी संपर्क साधण्यासाठी १० अंकी मोबाईल नंबरऐवजी १६०० ने सुरू होणारी विशेष सीरिज वापरावी लागेल. या बदलासाठी कंपन्यांना १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. यामुळे फोन उचलण्यापूर्वीच स्क्रीनवर १६०० ही सीरिज दिसेल, ज्यामुळे कॉल खरोखरच विमा कंपनीचा आहे की फेक, हे समजणे सोपे होईल. बहुतेक फ्रॉड प्रकरणांमध्ये भामटे १० अंकी मोबाईल नंबरवरून फोन करून स्वतःला इन्शुरन्स एजंट भासवतात.

नवीन नियमानंतर अशा बनावट कॉल्सवर आळा बसेल. कोणत्याही थर्ड-पार्टी ॲपशिवाय (उदा. ट्रूकॉलर)



सामान्य माणूस कॉलची ओळख पटवू शकेल. वैयक्तिक कॉल्स आणि बिझनेस कॉल्स यातील फरक स्पष्ट होईल, ज्यामुळे लोकांची दिशाभूल होणार नाही. TRAI ने केवळ विमा क्षेत्रासाठीच नाही, तर ठइख (बँकिंग), डएइख (शेअर बाजार) आणि PFRDA शी संबंधित संस्थांसाठीही हा नियम आधीच अनिवार्य केला आहे.

दूरसंचार विभागाने (DoT) विशेषतः बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा (BFSI) क्षेत्रासाठी १६०० सीरिज राखून ठेवली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ५७० हून अधिक मोठ्या संस्थांनी ही नवीन सीरिज स्वीकारली असून, ३००० पेक्षा जास्त नंबर जारी करण्यात आले आहेत. यामुळे येणाऱ्या काळात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## कार्बन डायऑक्साईडसाठी 'महाकाय स्पंज'

समुद्राच्या तळाशी असलेल्या लाव्हा अवशेषांमध्ये कार्बन डायऑक्साईडचा मोठा साठा साठवून ठेवण्याची क्षमता असल्याचे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे. हे अवशेष एखाद्या 'महाकाय स्पंज'प्रमाणे काम करतात, असा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. 'नेचर जिओसायन्स' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, दक्षिण अटलांटिक महासागराच्या तळातून गोळा केलेले पाषाण नमुने असे दर्शवतात की, हे अवशेष महासागराच्या वरच्या थरापेक्षा २ ते ४० पट अधिक कार्बन डायऑक्साईड साठवू शकतात. कोट्यवधी वर्षांच्या ज्वालामुखी क्रियांतून हे अवशेष तयार झाले आहेत. पृथ्वीच्या वातावरणात आणि कवचात कार्बनचे चक्र सतत सुरू असते. समुद्राच्या तळाशी असलेल्या डोंगररांगांमध्ये जेव्हा ज्वालामुखीचा उद्रेक होतो, तेव्हा मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईड बाहेर पडतो. मात्र, समुद्र केवळ पाण्याचे भांडे नसून तो कार्बन शोषून घेण्याचेही काम करतो.



युनिव्हर्सिटी ऑफ साऊथॅम्प्टनच्या संशोधक आणि सह-लेखिका रोझलिंड कॉगन यांनी सांगितले की, 'समुद्राचे पाणी कोट्यवधी वर्षे लाव्हाच्या भेगांमधून वाहत असते. या प्रक्रियेत खडकांशी रासायनिक अभिक्रिया होऊन पाण्यातील कार्बन डायऑक्साईड खडकांमध्ये 'कॅल्शियम कार्बोनेट'च्या स्वरूपात साठवला जातो. 'खनिजांनी युक्त असलेल्या या लाव्हा अवशेषांना 'ब्रेक्रिया' असे म्हणतात. संशोधकांनी दक्षिण अटलांटिक महासागराच्या ६.१ कोटी वर्षे जुन्या कवचातून हे नमुने ड्रिलिंग करून काढले आहेत.

या खडकांच्या वजनाच्या साधारण ७.५% हिस्सा हा कार्बन डायऑक्साईडपासून बनलेल्या खनिजांचा आहे. पूर्वीच्या नमुन्यांच्या तुलनेत यात २ ते ४० पट अधिक कार्बन साठलेला आढळला आहे. ज्वालामुखी प्रक्रियेतून बाहेर पडणाऱ्या एकूण कार्बनपैकी सुमारे २०% कार्बन हे खडक स्वतःमध्ये साठवून ठेवू शकतात. कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वीचे हवामान कसे बदलले आणि समुद्रातील या प्रक्रियेने वातावरणातील कार्बन

## 'टायटन'वर बर्फाळ समुद्र?

शनी ग्रहाचा सर्वात मोठा चंद्र असलेल्या 'टायटन'बाबत एक मोठी आणि खळबळजनक माहिती समोर आली आहे. नव्या संशोधनानुसार, टायटनच्या गोठलेल्या पृष्ठभागाखाली जीवसृष्टीला पूरक ठरू शकेल, असा 'चिखलयुक्त बर्फाचा' समुद्र असू शकतो. या शोधामुळे परग्रहावरील जीवसृष्टीच्या शोधाला नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

२००८ मध्ये नासाच्या 'कॅसिनी' अंतराळ यानाने पाठवलेल्या माहितीवरून असा अंदाज वर्तवण्यात आला होता की, टायटनच्या थराखाली एक विशाल महासागर दडलेला असू शकतो. मात्र, 'नेचर' या प्रसिद्ध नियतकालिकात १७ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या ताज्या विश्लेषणानुसार, तिथे मुक्त महासागर नसून बर्फाळ पाण्याने बनवलेले बोगदे आणि बर्फाच्या वितळलेल्या पाण्याचे साठे असू शकतात. वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीचे सहायक प्राध्यापक आणि या अभ्यासाचे सह-लेखक बाप्टिस्ट जर्नाक्स यांनी सांगितले की, 'हे पृथ्वीवरील महासागरांसारखे नसून आर्क्टिकमधील समुद्रातील बर्फ किंवा जमिनीखालील जलधरांसारखे असण्याची शक्यता आहे. याचा परिणाम तिथे कोणत्या प्रकारची जीवसृष्टी असू शकते आणि त्यांना आवश्यक पोषक तत्त्वे कशी मिळतात, यावर होईल.'



१९९७ मध्ये प्रक्षेपित झालेल्या 'कॅसिनी' यानाने शनीच्या कक्षेत २० वर्षे घालवून महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली होती. कॅसिनीने टायटनचा आकार 'लवचिक' असल्याचे आणि तो शनीभोवती फिरताना काहीसा दबला जात असल्याचे टिपले होते. शास्त्रज्ञांच्या मते, जर टायटनच्या आत पाण्याचा साठा असेल, तरच शनीच्या गुरुत्वाकर्षणामुळे त्याच्या पृष्ठभागावर असा ताण येऊ शकतो.

या संशोधनाचे मुख्य लेखक फ्लेविओ पेट्रिका यांच्या मते, शनीच्या गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव पडल्यानंतर सुमारे १५ तासांनी टायटनचा आकार बदलण्यास सुरुवात होते. यावरून असे दिसून येते की, टायटनच्या अंतर्गत भागाची रचना यापूर्वी समजल्या जाणाऱ्या रचनेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. हा वेगळा निष्कर्षच तिथे पाण्याचा अंश किंवा अर्धवट वितळलेला बर्फ असल्याचे सिद्ध करणारा मोठा पुरावा ठरला आहे. पाणी हा जीवसृष्टीचा मुख्य आधार असल्याने, टायटनवरील हा शोध भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

## सूर्याच्या बाह्य वातावरणाचा पहिला विस्तृत नकाशा

अंतराळ विज्ञानाच्या क्षेत्रात एका मोठ्या यशाची नोंद झाली आहे. नासाच्या 'पार्कर सोलर प्रोब'ने दिलेल्या माहितीच्या आधारे शास्त्रज्ञांनी पहिल्यांदाच सूर्याच्या सर्वात बाहेरील वातावरणाचा, म्हणजेच 'कोरोना'चा सविस्तर २-डी नकाशा तयार केला आहे. २०२१ पासून सूर्याच्या वातावरणात सातत्याने ये-जा करणाऱ्या या धाडसी मोहिमेमुळे हे शक्य झाले आहे.

पार्कर सोलर प्रोब हे इतिहासातील पहिले असे यान आहे जे एखाद्या ताऱ्याच्या इतक्या जवळ पोहोचले आहे. या यानाला खास 'हीट शिल्ड' (उष्णता कवच) बसवण्यात आले आहे, जे सुमारे १३७० अंश सेल्सिअस (२,५०० फॅरेनहाईट) पर्यंतचे तापमान सहन करू शकते. विशेष म्हणजे, सूर्याच्या 'कोरोना'चे तापमान १० ते ३० लाख अंश फॅरेनहाईटच्या दरम्यान असते. परंतु, हे वातावरण अत्यंत विरळ असल्यामुळे यानाला सुरक्षितपणे तिथून प्रवास करणे शक्य होते.

सूर्याच्या वातावरणाची एक अदृश्य सीमा असते, ज्याला 'अल्फवेन सरफेस' असे म्हणतात. या सीमेच्या पलीकडे गेल्यावर सौर कण ताशी १६ लाख किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या सौर वाऱ्याचा भाग बनतात. आतापर्यंत या सीमेचा नेमका आकार आणि स्वरूप एक रहस्य होते. मात्र, पार्कर सोलर प्रोबवरील उपकरणांनी गेल्या ७ वर्षांत जमा केलेल्या माहितीवरून असे सिद्ध झाले आहे की, सूर्याच्या हालचालींनुसार या सीमेचा आकार सतत बदलत असतो.



या संशोधनातून समोर आले आहे की, जेव्हा सूर्य अधिक सक्रिय असतो, तेव्हा ही सीमा अधिक खडबडीत आणि अशांत बनते. ही माहिती केवळ विज्ञानासाठीच नाही, तर पृथ्वीवरील दळणवळण यंत्रणेसाठीही महत्त्वाची आहे. सौर वादळांमुळे जीपीएस आणि रेडिओ लहरींमध्ये अडथळे येतात. शक्तिशाली सौर ज्वाळांमुळे वीजपुरवठा खंडित होऊ शकतो. या नकाशांच्या मदतीने शास्त्रज्ञ आता सौर वादळांचा अधिक अचूक अंदाज लावू शकतील,

# मोकाट कुत्रे, पथदिवे, जन्मदाखले, सभागृहाच्या दुरावस्थेवरुन नगरसेवक आक्रमक; महासभेत मनपा प्रशासनाचे काढले वाभाडे; अधिकाऱ्यांच्या घरी कुत्रे सोडण्याचा इशारा

नगर – महापालिकेच्या महासभेत नगरसेवकांनी शहरातील विविध नागरी प्रश्नांवर प्रशासनाला धारेवर धरत तीव्र नाराजी व्यक्त केली. मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव, शिक्षण व्यवस्था, शाळांची दुरवस्था, जन्म–मृत्यू दाखल्यांतील नोंदी, पथदिवे, सभागृहातील गळती, शाळांजवळ तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, धोकादायक शाळा इमारती, रस्त्यांवरील खड्डे अशा अनेक विषयांवर नगरसेवकांनी प्रशासनाचे वाभाडे काढले. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास अधिकाऱ्यांच्याच घरी कुत्रे सोडण्याचा इशाराही सभेत नगरसेवकांनी दिला.

महानगरपालिकेची महासभा २४ जुलै रोजी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभागृहात बोलण्याची संधी दिली जात नसल्याचा आरोप करत नगरसेवक अमोल येवले यांनी भोंगा आणून निषेध व्यक्त केला. त्यामुळे काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. तसेच महासभेत मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर नगरसेवकांनी तीव्र संताप व्यक्त केला. शहरात मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा वावर असून नागरिकांवर जीवघेणे हल्ले होत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. नगरसेवक मनोज कोतकर यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत, महापालिकेने मोकाट कुत्र्यांबाबत कोणतीही प्रभावी उपाययोजना केली नाही. नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. आता प्रशासनाने तातडीने कारवाई केली नाही तर आम्ही अधिकाऱ्यांच्या घरीच मोकाट कुत्रे सोडू, असा इशारा त्यांनी दिला. इतर नगरसेवकांनीही आपल्या–आपल्या प्रभागातील मोकाट कुत्र्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.


मनपाच्या महासभेत प्रश्न मांडताना संपत बारस्कर, बाबासाहेब वाकळे, कुमारसिंह वाकळे, मनोज कोतकर आदी.

महासभेत नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी जन्मदाखल्यांबाबत १५ हजार डुप्लिकेट नोंदी असल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर डॉ. सतीश राजूरकर यांनी स्पष्ट केले की, १७ हजार नोंदी या दुबार असल्याचे म्हणता येणार नाही. जुन्या नोंदींच्या दुरुस्तीमुळे त्या वाढल्या असून सर्व नोंदींची समितीमार्फत ३ महिन्यांत पडताळणी केली जाईल.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, २०२६ मध्ये क्यू आर कोड असलेल्या जन्मदाखल्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून ही परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे. समितीमार्फत तीन महिन्यांत संपूर्ण तपासणी करून अहवाल सादर करण्यात येईल.

डॉ. सागर बोरुडे यांनी जन्म–मृत्यू विभागात कर्मचारी अपुरे असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर आयुक्तांनी सांगितले की, महापालिकेतील ९८ टक्के लिपिक वर्ग सध्या एसआयआरच्या कामात गुंतलेला असून पुढील १५ दिवसांत कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर प्रलंबित कामे पूर्ण केली जातील.

संपत बारस्कर यांनी सभागृहातील दुरवस्थेचा मुद्दा उपस्थित करत, राष्ट्रगीतावेळी उभे राहताना अडचणी येतात. सभागृहात पाणी गळणे, टेबलांची दयनीय अवस्था झाली आहे. लोंबकळणाऱ्या विद्युत तारा धोकादायक असल्याचे सांगत त्यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. हा विषय अनेक वेळा मांडला आहे. प्रत्येक वेळी आश्वासने दिली जातात, पण प्रत्यक्षात काहीच होत नाही, असेही ते म्हणाले. यावर सभागृहाच्या कामात बदल करून वाढीव निधीसह काम करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे शहर अभियंता मनोज पारखे यांनी सांगितले. त्यावर संपत बारस्कर व बाबासाहेब वाकळे यांनी, तुमचे वायरमन झोपा काढतात का? लोंबकळणाऱ्या वायरांसाठी पैसे घेतले जातात का? असा संतप्त सवाल उपस्थित केला. बारस्कर म्हणाले, फक्त आश्वासने देऊ नका. चुकीचे अंदाजपत्रक का तयार झाले, याचे उत्तर द्या.

निखिल वारे यांनी शाळांपासून ५०० मीटर परिसरात तंबाखू व मादक पदार्थांची विक्री होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, शिक्षण मंडळाने याबाबत काय कारवाई केली? शाळा आणि अन्न व औषध प्रशासनाला पत्र दिले का? आयुक्तांनीही यावर पांघरूण घालू नये. शिक्षण मंडळाची जबाबदारी नाकारता येणार नाही. त्यांनी महापालिकेच्या शाळांमधील स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेकडेही लक्ष वेधले आणि शालेय शिक्षण व व्यवस्थापन समिती सक्रिय करण्याची मागणी केली. महापालिका खड्डे, रस्ते आणि लाईटमध्येच अडकून पडली आहे. शहराच्या शिक्षणाची वाट लागली आहे, असा आरोपही वारे यांनी केला.

कुमारसिंह वाकळे यांनी बोल्हेगाव गावठाणातील जिल्हा परिषद शाळेची धोकादायक इमारत तातडीने पाडण्याची मागणी केली.

शहर अभियंता मनोज पारखे यांनी जिल्हा परिषदेला प्रस्ताव पाठविल्याचे सांगितले. दिपाली बारस्कर यांनी शाळांमधील परिवहन समिती आणि सावित्री समित्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केला. त्या म्हणाल्या, मी स्वतः एका समितीची सदस्य आहे; प्रत्यक्षात कोणतीही शाळा या समित्यांचे काम करत नाही. तर संपत बारस्कर आणि विकी जगताप यांनी शहरात आणि सावेडी उपनगरात नवीन शाळांसाठी जागा निश्चित करण्याची मागणी केली. संपत बारस्कर म्हणाले, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू कराव्यात. शिक्षक महापालिकेचे असावेत. शासनाचे नसावेत. काका ट्रस्टच्या माध्यमातून त्या चालविण्याची आमची तयारी आहे.

शारदा ढवण यांनी प्रभागांतील खड्डे, साचलेले पाणी आणि औषध फवारणी होत नसल्याची तक्रार केली. त्यांनी अधिकाऱ्यांनी दर आठवड्याला प्रत्येक प्रभागात दुचाकीवरून फिरून पाहणी करावी, अशी मागणी केली. शहरातील नव्याने विकसीत होणाऱ्या भागात नवीन पथदिवे बसविण्याचा प्रश्न उपस्थित करीत ठेकेदार केवळ दुरुस्ती करीत असून नवीन दिवे बसविले जात नसल्याबद्दल नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली.

## ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा २६ जुलैला प्रारंभ; गुरु–शिष्य परंपरेवर आधारित शोभायात्रा काढणार

नगर – ज्ञानं यस्य बलं तस्य हे प्रेरणादायी ब्रीदवाक्य अंगीकारून गेली २५ वर्षे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अहिल्यानगर येथील ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी (२५ व्या) वर्षाचा शुभारंभ २६ जुलै रोजी होणार आहे. या निमित्ताने भारतीय संस्कृतीतील गुरु–शिष्य परंपरा या संकल्पनेवर आधारित शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून, वर्षभर शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडाविषयक विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती शाळा प्रशासनाने दिली.

गेल्या पावशतकात ज्ञानसंपदा शाळेने हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला ज्ञान, शिस्त, सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेमाची दिशा देत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा समतोल साधत शाळेने शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

रौप्य महोत्सवी वर्षाच्या शुभारंभानिमित्त आयोजित शोभायात्रेत ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक विषयांवरील आकर्षक जिवंत देखावे सादर करण्यात येणार आहेत. भारतीय संस्कृतीतील गुरूचे श्रेष्ठ स्थान, संस्कारमूल्ये आणि समृद्ध ज्ञानपरंपरेचा गौरव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा अभिनव उपक्रम असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले.

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि समाजबांधव यांच्या सहभागातून वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिक्षण परिषद, व्याख्यानमाला यांसारखे शैक्षणिक व बौद्धिक कार्यक्रम, मॅरेथॉन स्पर्धा, ज्ञानसंपदा स्मृतीवन हा पर्यावरणपूरक प्रकल्प, स्वच्छता अभियान, ज्ञानोत्सव आनंद मेळा, माजी विद्यार्थी मेळावा तसेच वार्षिक स्नेहसंमेलन आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

२६ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता गंगा उद्यान येथून शोभायात्रेला प्रारंभ होईल. ही शोभायात्रा आकाशवाणी – प्रोफेसर चौक – कुष्ठधाम रोड – भिस्तबाग चौक मार्गे सायंकाळी ६.३० वाजता भिस्तबाग महाल येथे सांगता होणार आहे. या भव्य शुभारंभ सोहळ्यास व शोभायात्रेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन ज्ञानसंपदा शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.



दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीमाराच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

## विद्यार्थ्यांवरील लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

नगर – नवी दिल्लीतील जंतर–मंतर व संसद मार्चदरम्यान शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष पोलिस लाठीहल्ल्याचा अहिल्यानगर–मधील पुरोगामी पक्ष आणि संघटनांच्या वतीने २३ जुलै रोजी तीव्र निषेध करण्यात आला.

नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी आणि या संपूर्ण अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

निदर्शनानंतर आंदोलकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी बोलताना आंदोलक नेत्यांनी केंद्र सरकारच्या दडपशाहीवर जोरदार हल्लाबोल केला. देशभरातील विद्यार्थी गेल्या महिन्याभरापासून आपल्या न्याय्य हक्कांसाठी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहेत. नीट पेपरफुटीमुळे आलेल्या नैराश्यातून आतापर्यंत २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्यासारखे गंभीर वास्तव समोर आले आहे. असे असतानाही संवाद साधण्याऐवजी २० जुलै रोजी संसद मार्चदरम्यान आंदोलन दडपण्यासाठी विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला करण्यात आला. हा भारतीय राज्यघटनेने दिलेल्या लोकशाही अधिकारांवर झालेला थेट आघात आहे, असा आरोप याप्रसंगी करण्यात आला. यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड मेहबूब सय्यद, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत साथी सुभाष वारे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड सुधीर टोकेकर, कॉम्रेड सिद्धेश्वर कांबळे, सीटू राज्य कार्यकारिणी सदस्य कॉम्रेड प्रविण सोनवणे, सीटू जिल्हा समन्वयक कॉम्रेड राजू वैराळ, भाकपा–माले कॉम्रेड विनायक गोरखे, कॉम्रेड अनंत लोखंडे, कॉम्रेड सोमनाथ केंजळे, कॉम्रेड संदीप सकट, कॉम्रेड किरण वाळके, ॲड. प्रदीप सकट, श्याम वैराळ, अमित टेंबरे, लक्ष्मण शिंदे, विजय राहींज, अविनाश साठे, अतुल महारनवर, अपेक्षा साळवे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पुरोगामी पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा नगरमध्ये निषेध

### पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; दोषींवर कारवाईची मागणी

नगर – दिल्लीतील जंतर–मंतर येथे विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्ज व अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केल्याच्या घटनेचा निषेध करत पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.


दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा निषेध करत दोषींवर कारवाईची मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीतर्फे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात संबंधित घटनेची सखोल व निष्पक्ष कायदेशीर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नीट, विविध शासकीय भरती परीक्षा आणि शिक्षक पात्रता परीक्षा यांसह विविध स्पर्धा परीक्षांचे वारंवार पेपरफुटीचे प्रकार समोर येत असल्याने त्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या अनियमिततेची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड, किरण गायकवाड, गौतम म्हस्के, महिला जिल्हाध्यक्ष गौतमीताई भिंगारदिवे, सुरेश भिंगारदिवे, युवक जिल्हाध्यक्ष सागर ठोकळ, मंगल पालवे, प्रशांत भिंगारदिवे, अनिकेत विधाते, लता बर्डे, लतिका पाटोळे, कविता भिंगारदिवे, राधा पाटोळे, सुनीता धनवटे, सुमन काळापहाड, नयन खंदारे, किरण शिंदे, महिला शहर जिल्हाध्यक्ष जयश्री गायकवाड, सिद्धांत गायकवाड, सारिका गांगुर्डे, माया जाधव, ज्योती साठे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रियदर्शनी पब्लिक स्कूलमध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

नगर – प्रियदर्शनी पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज भिंगार येथे २३ जुलै रोजी लोकमान्य टिळकांची जयंती अत्यंत उत्साहात व आदराने साजरी करण्यात आली.


लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त समहूगीत गाताना विद्यार्थी.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली बोधक व शाळेचे उपमुख्याध्यापक अमोल घोरपडे यांच्या हस्ते टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. शाळेच्या विद्यार्थ्यांनी आजच्या सामाजिक परिस्थितीशी सुसंगती व टिळकांचा स्वातंत्र्यलढ्यातील सामाजिक सुधारणांच्या योगदानाचे स्मरण आपल्या परिपाठातून दर्शवले. यासाठी विद्यार्थ्यांना शाळेच्या शिक्षिका शिल्पा भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. टिळकांच्या एकतेच्या आणि राष्ट्रप्रेमाच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प आजच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यास देण्यात आला. यावेळी शाळेचे संस्थापक डॉ. बाळासाहेब खोमणे, मुख्याध्यापिका अंजली बोधक, उपमुख्याध्यापक अमोल घोरपडे तसेच सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला शालेय अभ्यासक्रमात योग्य स्थान द्यावे

### खा. नीलेश लंकेंची यांची लोकसभेत मागणी



नगर – राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाला राष्ट्रीय शालेय अभ्यासक्रमात योग्य स्थान मिळावे आणि त्यांच्या कार्याचा सविस्तर, वस्तुनिष्ठ व गौरवशाली इतिहास एनसीईआरटी व सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पूर्ववत समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी लोकसभेत नियम ३७७ अंतर्गत केली.

लोकसभेत मांडलेल्या निवेदनात खासदार लंके यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ तसेच एनसीईआरटी व सीबीएसईच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा सविस्तर भाग वगळण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या कार्याचा अत्यंत मर्यादित उल्लेख करण्यात आल्याने महाराष्ट्रातील जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांना इतिहासाची अपूर्ण माहिती मिळत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी सन १९९१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र विधानमंडळाने संमत केलेल्या ठरावाचा उल्लेख केला. या ठरावानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास बदलला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राज्याने घेतली होती. मात्र, सध्याच्या अभ्यासक्रमातील बदल हा त्या निर्णयाच्या विरोधात असल्याचे त्यांनी नमूद केले.

खासदार लंके यांनी सांगितले की, इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या एनसीईआरटी व सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख अत्यंत मर्यादित स्वरूपात करण्यात आला आहे. तसेच इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा वगळण्यात आल्याचाही मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला. इतिहासाचे अचूक आणि सर्वसमावेशक ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाबरोबरच त्यांचे प्रशासन, आरमार, गनिमी कावा, लोककल्याणकारी राज्यकारभार आणि सामाजिक दृष्टीकोन यांची माहितीही विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भविष्यातील पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची संपूर्ण माहिती मिळावी आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचा सन्मान राखला जावा, यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करून एनसीईआरटी व सीबीएसईच्या अभ्यासक्रमाचा फेरआढावा घ्यावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा सविस्तर, वस्तुनिष्ठ व गौरवशाली इतिहास पूर्ववत समाविष्ट करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली. महाराष्ट्राच्या अस्मितेशी आणि देशाच्या इतिहासाशी निगडित असलेल्या या विषयावर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## चेतना कॉलनीत घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक

### चोरीस गेलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम हस्तगत

नगर – एमआयडीसी परिसरातील दांगटमळा, चेतना कॉलनी घडलेली घरफोडीची घटना उघडकीस आणण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

चेतना कॉलनी येथे राहणाऱ्या स्वाती बंडू देशपांडे यांच्या बंद घरातील कपाट उघडून १५ जुलै ते १७ जुलै दरम्यान अज्ञात चोरट्याने सोन्याची नथ, सोन्याचा पत्ता, सोन्याचे मणी आणि रोख रक्कम चोरून नेली होती. या प्रकरणी स्वाती देशपांडे यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.


चेतना कॉलनीत घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक केल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

गुन्ह्याचा तपास करत असताना एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात यांना गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली की, ही घरफोडी दीपक रावसाहेब चांदणे (वय ४०, रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) याने केली आहे. आरोपी गजानन कॉलनी परिसरात येणार असल्याची पक्की माहिती मिळताच तपास पथकाने तात्काळ तेथे सापळा रचून दीपक चांदणे याला ताब्यात घेतले. पोलीस खाक्या दाखवताच आरोपीने घरफोडीची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम जप्त केली आहे.

ही कारवाई स.पो.नि. हेमंत थोरात, स.फौ. राकेश खेडकर, पोलीस अंमलदार संदीप पवार, शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त वृक्षारोपण करण्याचे आवाहन

नगर – आषाढी एकादशी निमित्त नागरिकांनी एक झाड लावून वृक्षारोपण करावे असे आवाहन भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व सेंट्रल रेल्वे बोर्डचे जिल्हाध्यक्ष अनिल सबलोक यांनी केली आहे.

नगर हे सिमेंटचे जंगल होत चालले आहे व त्यामुळे पर्यावरणास धोका निर्माण झालेला आहे. त्यासाठी एक तरी झाड लावावे. तसेच भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते सर्व विठ्ठल मंदिरांच्या बाहेर रोपे व झाडे घेऊन थांबणार आहेत व सर्वांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा. तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांचेकडे सुध्दा झाडांची व रोपांची व्यवस्था केलेली आहे. तरी नागरीकांनी येथुन सुध्दा रोपे घेऊन जावेत.

## जिल्हास्तरीय 'नशामुक्त भारत' स्पर्धांचे २९ जुलैला आयोजन

नगर – भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत, अहिल्यानगर आणि सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा शक्ती–नशामुक्त भारताची शक्ती' या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन २९ जुलै रोजी सीएसआरडी येथे करण्यात येणार आहे.

युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ करणे, या उद्देशाने जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक–युवतींना या स्पर्धांमध्ये वैयक्तिक किंवा सांघिक स्वरूपात सहभागी होता येणार आहे. स्पर्धांमध्ये लोकगीत (गायन), नृत्य, नुक्कड नाटक, माईम, चित्रकला, वादविवाद, लघुपट/रील, घोषवाक्य लेखन तसेच कविता (स्लॅम पोएट्रीसह) या विविध कला व साहित्य प्रकारांचा समावेश करण्यात आला असून, सर्व स्पर्धांचा विषय 'नशामुक्त भारत' हा आहे. युवकांनी आपल्या कलाकृतीतून व्यसनमुक्तीचा प्रभावी व सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये मिळणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी मेरा युवा भारत पोर्टलवर नोंदणी करून इच्छित स्पर्धेची निवड करावी आणि मार्गदर्शक सूचनांनुसार ऑनलाईन अर्ज सादर करावा.

अधिक माहितीसाठी ९४२३४७०४३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आयोजकांनी कळविले आहे.

